सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास व पंचायत राज विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण




# महा आवास

## त्रैमासिक

@MAHAAWAAS www.mahaawaas.org

जानेवारी ते मार्च २०२४

# क्षणचित्रे



मोदी आवास घरकुल योजना शुभारंभ व पहिला हप्ता वितरण कार्यक्रमा प्रसंगी यवतमाळ येथे मा.प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांचे स्वागत करतांना मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे, मा.उप मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस, मा.उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार




मोदी आवास घरकुल योजना शुभारंभ व पहिला हप्ता वितरण कार्यक्रमा प्रसंगी यवतमाळ येथे मा.प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते महत्वाकांक्षी प्रकल्पांचे शुभारंभ, अनावरण, राष्ट्राला समर्पण आणि लाभाचे वितरण



शासन आपल्या दारी या कार्यक्रमा प्रसंगी कोल्हापूर येथे मा.मुख्यमंत्री, श्री.एकनाथ शिंदे यांचे स्वागत करतांना जिल्हाधिकारी, कोल्हापूर श्री.अमोल येडगे



शासन आपल्या दारी या कार्यक्रमा प्रसंगी कोल्हापूर येथे जनतेला संबोधित करतांना मा.मुख्यमंत्री, श्री.एकनाथ शिंदे व व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय


## महा आवास

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | श्री. एकनाथ डवले, भा.प्र.से.<br>प्रधान सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे<br>संचालक, ग्रामीण गृहनिर्माण,<br>महाराष्ट्र राज्य |
| प्रबंध संपादक | नीलेश काळे, उप संचालक<br>राजलक्ष्मी येरपुडे, उप संचालक<br>सुनिल मोरे, सहा. संचालक (लेखा)<br>अपर्णा पाटणे, सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| सहयोगी संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.org |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |


## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | विशेष - महा आवास अभियान २०२३-२४ फलश्रुती | ३ |
| ३ | महा आवास अभियान २०२३-२४ मध्ये सक्रिय सहभाग घेणेबाबत मान्यवरांचे पत्र | ८ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | १२ |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १४ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १६ |
| | समन्वय उपक्रम | १८ |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २० |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २१ |
| | रमाई आवास योजना | २२ |
| | शबरी आवास योजना | २३ |
| | पारधी आवास योजना | २४ |
| | आदिम आवास योजना | २५ |
| | प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान | २५ |
| | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना | २६ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २६ |
| | मोदी आवास घरकुल योजना | २७ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ७ | फोटो गॅलरी | ३४ |
| ८ | मिडिया कवरेज | ३५ |



वर्ष ४ थे । अंक १५ वा । जानेवारी ते मार्च २०२४


महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



## डॉ. राजाराम दिघे
## संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य

महा आवास त्रैमासिकाच्या माध्यमातून आपणासोबत संवाद साधताना मला अत्यंत आनंद होत आहे. माहे जानेवारी ते मार्च २०२४ या कालावधीमध्ये राज्याच्या ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये विविध स्तरावर घडत असलेल्या घडामोडींचा धांडोळा घेण्याबरोबरच केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविषयीचाही उहापोह या निमित्ताने करणे आवश्यक वाटते.

ग्रामीण आवास योजना केंद्र व राज्य शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प असल्यामुळे त्यामध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी अनेक प्रयत्न केंद्र व राज्य पातळीवर होताना दिसत आहेत. तसेच राज्यामध्ये राबविण्यात येत असलेले महा आवास अभियानाची प्रगतीही या निमित्ताने आपण पाहत आहोत. मागील तीन अभियानांच्या पार्श्वभूमीवर या अभियानामध्ये अनेक नाविन्यपुर्ण उपक्रम हाती घेतले असून याला प्रतिसादही मोठया प्रमाणावर मिळताना दिसत आहे.

महाराष्ट्रामध्ये आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून आपण प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १२ लाखापेक्षा अधिक घरकुले पुर्ण केली आहेत. त्याचप्रमाणे राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण आवास योजने अंतर्गत ४.९५ लाखापेक्षा अधिक घरकुले पुर्ण केली आहेत. असे असले तरी अद्याप केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांतील मंजूरी दिलेली ५.८१ लाखापेक्षा अधिक घरकुले पुर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

महा आवास अभियानाच्या विविध उपक्रमांचा धांडोळा घेतला असता **९१,९१२ भूमिहीन लाभार्थ्यांना आपण आजअखेर जागा उपलब्ध** करून दिली असून अद्याप १६,५८७ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. मागील तीन महिन्यांमध्ये हप्ते वितरणात आपली प्रगती चांगली राहिली आहे. तसेच घरकुल मार्ट, सँड बँक, प्रलंबित घरकुले पुर्ण करणे, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पुर्ण करणे व त्यांचे मुल्यांकन करणे, सामाजिक लेखापरिक्षण करणे, इंदिरा आवास योजनेतील अपुर्ण घरकुले पुर्ण करणे, शासकीय योजनांशी कृती संगम करणे, नाविन्यपुर्ण उपक्रम राबविणे यातही आपली प्रगती उल्लेखनीय राहिली आहे. या सर्व बाबींमध्ये जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरील अधिकारी/कर्मचारी तसेच लाभार्थ्यांचा सक्रिय सहभाग महत्वाचा आहे.

महा आवास अभियानाला अधिक गतिमान करण्यासाठी मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.मंत्री, महसूल, मा. मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मा. अतिरिक्त मुख्य सचिव महसूल विभाग व मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या अनुक्रमे पंचायत समितीचे सभापती, तहसिलदार, तलाठी, सरपंच, ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अभियानात सक्रिय सहभाग घेणेबाबत दिलेल्या पत्रांमुळे अभियानाला गतिमानता प्राप्त झाली असून त्यांच्या स्तरावर अभियानाचा आढावा घेण्यात येत आहे. याचा सविस्तर अहवाल सदर अंकामध्ये देण्यात आला आहे.

महा आवास अभियान २०२३-२४ मध्ये नोव्हेंबर, २०२३ पासून मार्च २०२४ अखेर उपक्रमांमध्ये गतिमानता प्राप्त झाली असली तरी लोकसभा निवडणूक आचारसंहितेमुळे घरकुलांच्या मंजूरी प्रक्रियेत अडचण येवू शकते. या अभियानास माहे जून २०२४ पर्यंत मुदतवाढ मिळविण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात आली असली तरी आदर्श आचारसंहितेमुळे यामध्ये तांत्रिक अडचणी येऊ शकतात.

या पार्श्वभूमीचा आढावा घेतला तरी आजपर्यंत राबविण्यात आलेल्या महा आवास अभियानाचा थोडक्यात उहापोह येथे करणे गरजेचे वाटते. या अभियानात राज्य योजनेतील ५ लाखापेक्षा अधिक लाभार्थ्यांना मंजूरी दिली आहे. यामध्ये प्रामुख्याने मोदी आवास घरकुल योजना, रमाई आवास योजना व शबरी आवास योजनांचा समावेश होतो. हप्ते वितरणामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत २,२३,८०५ लाभार्थ्यांना पहिला, दुसरा व तिसऱ्या हप्त्याचे वितरण करण्यात आले आहे. तर राज्यपुरस्कृत आवास योजनेतील ६,७६,७०५ लाभार्थ्यांचा यामध्ये समावेश होतो. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील १,६४,१९२ तर राज्य पुरस्कृत योजनेतील ९४,९२१ अशी एकूण **२,५९,११३ घरकुले पुर्ण करण्यात आली आहेत.** तर ग्रामीण गवंडी प्रशिक्षण व विविध उपाययोजनांच्या माध्यमातून राज्यातील **२६,६६६ प्रलंबित घरकुले पुर्ण**

**करण्यात आली** आहेत. विविध शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून लाभार्थ्यांना मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. अभियानाच्या नाविन्यपुर्ण उपक्रमांमधील आपल्या सक्रिय सहभागामुळे अभियानास गतिमानता प्राप्त होत आहे.

सन २०२३ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास व बहुजन कल्याण विभागाने राज्यातील इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी घोषित केलेल्या राज्य पुरस्कृत मोदी आवास घरकुल योजनेंसाठी आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२५-२६ या तीन वर्षात एकूण १० लाख घरे बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ३ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते त्यापैकी जवळपास सर्व ३ लाख घरे 'मोदी आवास घरकुल योजने' अंतर्गत मंजूर करण्यात आली असून **भारताचे माननीय पंतप्रधान यांच्या शुभहस्ते मोदी आवास घरकुल योजनेतील २.६५ लाख पेक्षा जास्त लाभार्थ्यांना पहिला हप्त्याचे** रु.४०० कोटी इतक्या रक्कमेचे डिजिटल हस्तांतरण करण्यात आले, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. इतक्या मोठया प्रमाणात एका राज्यात लाभार्थ्यांना एकाच वेळी निधी वितरण करणे ही कदाचित देशातील एकमेव घटना असेल. आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून मंजूरीची व हप्ते वितरणाची ही प्रक्रिया आपण यशस्वीरित्या पार पाडली याचे समाधान आहे व या कामासाठी सर्व यंत्रणेचे अभिनंदन!

त्याचबरोबर **प्रधानमंत्री–जनजाती आदिवासी न्याय महाअभियान** (PM-JANMAN) ही राज्यातील कोलाम, कातकरी व माडीया गोंड या आदिम जमातीसाठीची योजना केंद्र शासनाने नव्याने सुरू केली. या योजनेच्या यशस्वीतेसाठीही अहोरात्र मेहनत घेऊन आपण केंद्र शासनाने मंजूरी व पहिला हप्ता वितरणाचे विशिष्ट कालावधीचे आपल्या राज्याचे उद्दिष्ट यशस्वीरित्या पार पाडले. तसेच राज्यातील या योजनेच्या लाभार्थ्यांशी **मा.प्रधानमंत्री, श्री.नरेंद्र मोदी यांनी संवाद साधला** ही बाब इथे मला नोंद करावी वाटते.

तसेच प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण मधील **केंद्र शासनाकडून कार्यक्रम निधी व प्रशासकीय निधीचा पुढील हप्ता** प्राप्त करून घेण्यासाठी राज्यामध्ये आपल्या विभागाचे मा. प्रधान सचिव यांच्या मार्गदर्शनामध्ये राबविण्यात आलेल्या मोहिमेमधील आपल्या सर्वांच्या सक्रिय सहभागाने आपणास खर्चाची मर्यादा गाठता आली.तसेच पुढील हप्ता वेळेत प्राप्त करून घेता आला याबद्दलही आपले सर्वांचे अभिनंदन.

दरम्यानच्या काळामध्ये आपण घरकुले पुर्ण करणे व घरकुलांना मंजूरी देण्यासाठी मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली विभागनिहाय मोहिमांचे आयोजन केले होते. या मोहिमांच्या माध्यमातून राज्यस्तरीय, विभागस्तरीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांच्या सहाय्याने गतिमान पद्धतीने घरकुले पुर्ण केली आहेत. **विभागस्तरावर राबविण्यात आलेल्या मोहिमेचा** चांगला फायदा घरकुले पुर्ण करण्यामध्ये झाला. हे अभियान अहमदनगर, लातूर, वर्धा व नवी मुंबई या ठिकाणी घेण्यात आले असून यामध्ये सर्वांच्या सक्रिय सहभागाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १२,३५७ घरकुले पुर्ण करण्यात आली.

राज्यातील भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या राज्य कृती दलाची बैठकीच्या माध्यमातून सर्व विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याशी झालेल्या संवादामुळे जागा उपलब्ध करून देण्यामध्ये सकारात्मक परिणाम दिसून आला. तसेच पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या अर्थसहाय्यात रू.५० हजारांची वाढ करण्यात आल्यामुळे लाभार्थ्यांना आता रू.१ लक्ष पर्यंतचे अर्थसहाय्य मिळणार आहे. याचा जास्तीत जास्त फायदा भूमिहीन लाभार्थ्यांना मिळवून देण्यासाठी आपण सर्वोतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

तसेच राज्य, विभाग, जिल्हा तालुकास्तरावर घेण्यात आलेल्या विविध आढावा बैठका, कार्यशाळा, क्षेत्रीय भेटी, यामध्ये राज्यातील अधिकारी यांच्या भेटीबरोबरच ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकारच्या अधिकाऱ्यांच्या भेटीचे वृत्तांकन करण्यात आले आहे. नाविन्यपुर्ण उपक्रम, विभागनिहाय यशोगाथा, जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमांचे फोटो, ठळक घडोमोडींचे फोटो व विविध वृतपत्रांमध्ये प्रसिध्दी झालेल्या बातमीपत्रांचा समावेश सदरच्या अंकामध्ये करण्यात आला आहे.

महा आवास अभियानाच्या उर्वरीत कालावधी मधील उत्कृष्ट कामासाठी शुभेच्छांसह!

डॉ. राजाराम दिघे
संचालक, ग्रामीण गृहनिर्माण,
महाराष्ट्र राज्य

# महा आवास अभियान २०२३-२४ फलश्रुती

**"सर्वांसाठी घरे-२०२४"** हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना तसेच त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमण नियमानुकूल करणे अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत.

या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे या हेतूने महाराष्ट्र राज्यात **दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ३१ मार्च २०२४ या कालावधीत "महा आवास अभियान २०२३-२४"** राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले, मा. सचिव, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना श्री. के. टी. पाटील व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे संपन्न झाला. या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेला सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, महा आवास अभियान २०२१-२२ पुरस्कार विजेते, ग्राम विकास व पंचायत राज विभाग व राज्य व्यवस्थापन कक्षातील सर्व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.




**दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ३१ मार्च २०२४ या कालावधीत "महा आवास अभियान २०२३-२४"** अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची फलश्रुती पुढीलप्रमाणे आहे.

## i.भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे

ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी **पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना**, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना व इतर मार्ग-उदा. बक्षीसपत्र, संमतीपत्र, भाडेपट्टा, इ. प्रभावीपणे राबवून ८,६१० भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करून देण्यात आली.

तसेच राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायत क्षेत्रात नागरीकरणामुळे जागा उपलब्ध होत नाही. ग्रामीण भागात सद्यस्थितीत जागांच्या किंमती पाहता, प्रत्यक्षात जागा खरेदी करण्यासाठी उपलब्ध होणारी रक्कम रु. ५०,०००/- मध्ये ५०० चौ. फु. जागा खरेदी करणे देखील शक्य होत नाही. सदरची वस्तुस्थिती विचारात घेवून पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना घरकुल जागा खरेदीसाठी सध्याची रक्कम रु. ५०,०००/- यात वाढ करुन प्रति लाभार्थी रु. १,००,०००/- इतकी करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.



## ii.घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेल्या घरकुल उद्दिष्टांनुसार घरकुलांना १०० टक्के मंजूरी देणे या उपक्रमाच्या माध्यमातून अभियानात केंद्र

पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत एकुण ५,०८,१५१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली. लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी लाभार्थी मेळावे, लाभार्थ्यांना **घरकुल मंजूरीचे पत्र** वितरण, भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करुन घरकुल बांधकामाबाबत तांत्रिक मार्गदर्शन करून **बांधकाम सुरु केले**.

### iii.मंजूर घरकुलांना सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत २,२३,८०५ व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत ६,७६,७०५ अशा एकुण ९,००,५१० मंजूर घरकुलांना **पहिला, दुसरा व तिसऱ्या हप्त्याचे वितरण** घरकुलांच्या भौतिक प्रगतीनुसार विनाविलंब वितरीत केले. लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी स्थानिक स्तरावर **हप्ते वितरण कार्यक्रमाचे आयोजन** करण्यात आले.

### iv.सर्व मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १,६४,१९२ व राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत ९४,९२१ अशा एकुण २,५९,११३ मंजूर घरकुलांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण केले. लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी त्यांच्या बैठका/ मेळावे घेण्यात आले. तसेच सरपंच, ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी, महिला स्वयंसहाय्यता गट, अंगणवाडी कर्मचारी, आशा कर्मचारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, इ. यांनी घरकुलांना वेळोवळी भेटी देवून मंजूर घरकुले किमान कालावधीत व गतीने पूर्ण करण्यात विशेष कामगिरी बजावली.

### v.प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे

प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी प्रलंबित घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून त्या **कारणांचे विश्लेषण करुन त्यावर उपाययोजना करून २६,६६६ घरकुले पूर्ण करण्यात आली**.

याकामी गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने '**लोक अदालत**' वा इतर मार्गाने लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त केले. तसेच पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार Refund करुन Remand केली. तसेच **यापुढे प्रलंबित घरकुलांच्या यादीमध्ये नवीन घरकुलांचा समावेश होणार नाही याची दक्षता घेण्याचे सुचित केले**.

### vi.ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत २,५७८ ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट हे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून **९,९९४ मुल्यांकन**(Assessment) **पूर्ण करुन** सदरची माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत करण्यात आली.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रलंबित घरकुले (Deleayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाचा उपयोग करून घरकुले पूर्ण केली. तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल तयार करून या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेण्यात येत आहे**.




### vii.बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी करणे

जागांची कमतरता व जागांच्या किमती यांचा विचार करून कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करून, प्रवृत्त करून एकत्र आणून व त्यांच्या एकत्रित निधीतून जागा खरेदी करून त्याद्वारे





त्यांच्या बहुमजली इमारती, गृहसंकुले व अपार्टमेंट द्वारे घरांचे स्वप्न पूर्ण केले. अशा लाभार्थ्यांच्या राज्यात **प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये** प्रत्येकी किमान एक याप्रमाणे **६७ बहुमजली इमारती** (G+1 ते 4), **३६ गृहसंकुले व ३ हाऊसिंग अपार्टमेंट** उभारण्यात आल्या.


### डेमो हाऊसचा प्रभावी वापर करणे

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत तालुका व जिल्हा स्तरावर एकुण ३५८डेमो हाऊसची निर्मिती करण्यात आली आहे. लाभार्थ्यांना मार्गदर्शनासाठी या डेमो हाऊसेसला २,०६,५१८ लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटीचे आयोजन केले आहे. तसेच ग्रामपंचायत स्तरावरील डेमो हाऊस मॉडेल लाभार्थ्यांस वेळोवेळी दाखवून त्याप्रमाणे त्यांच्या घरकुलांची कामे होण्यासाठी त्यांचा प्रभावी वापर होत आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा **लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ग्रामसंघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून १७७ कॉप-शॉप** (Co-op Shop) **सुरु करण्यात आले आहे.**




### ix.शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence) करणे

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगम करून ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून** ३८,४८,३८९ मनुष्य दिवस रोजगार, **स्वच्छ भारत मिशन (ग्रा) मधून १,०८,०६८ शौचालये, जल जीवन मिशन मधून ७२,५९६ घरांना** नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, **प्रधानमंत्री उज्वला योजनेमधून ९१,२५०** गॅस जोडणी, **सौभाग्य योजनेमधून** ८०,६९२ विद्युत जोडणी, **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशनमधून २,२६,३८५** उपजिविका साधनांची उपलब्ध**ता, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा) मधून** उर्जेच्या बचतीसाठी **साधने** तसेच **दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्राम पंचायत सेस, सीएसआर निधी** इ. च्या माध्यमातून लाभार्थ्यांची घरकुले, बहुमजली इमारती, गृहसंकुले, हाऊसिंग अपार्टमेंट यांना ३४,९४१ **मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे,** इ. उपलब्ध करुन देण्यात आले आहे.






### x.नावीन्यपूर्ण उपक्रम (Innovations / Best Practices) राबविणे

ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम

**१. लॅण्ड बँक :-** सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची ४० '**लॅण्ड बँक**' तयार करण्यात आली.

**२. सॅण्ड बँक :-** सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे ८०४ '**सॅण्ड बँक**' ची निर्मिती करण्यात आली.



**३. घरकुल मार्ट :-** राज्यात महिला स्वयंसहायता गट/ग्राम संघ/ प्रभाग संघ/ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे ६४ **घरकुल मार्ट** सुरू करून त्याद्वारे घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे – दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. विक्रीसाठी उपलब्ध केले.




**४ . गृहकर्ज :-** घरकुलांचे बांधकाम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी वित्तीय संस्थांच्या समन्वयातून गरजेप्रमाणे इच्छुक ७६ लाभार्थ्यांना **गृहकर्ज** मिळवून देण्यात आले.

**५.वाळूला पर्याय :-** क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इ. ६२,५३६ साहित्याचा वापर **वाळूला पर्याय** म्हणून केला.

**६.मॉडेल हाऊसेस :-** किमान १०% घरकुल बांधकामामध्ये फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा वापर करून **६,१८२ मॉडेल हाऊसेस** उभारले. रंगरंगोटी करतांना शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार घरकुलांना आकर्षक रंगसंगती केली.

**७ . नवनवीन तंत्रज्ञान :-** किमान १० % घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, किफायतशीर बांधकाम व नैसर्गिक आपत्तीरोधक तंत्रज्ञान, इ. १,००,८९६ **नवनवीन तंत्रज्ञानाचा** वापर केला.

**८.पथदर्शी प्रकल्प :-** सिडको (City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited) सारख्या शहरी गृहनिर्माण करणाऱ्या संस्थांच्या मदतीने **पथदर्शी प्रकल्प** म्हणून १,०५५ Precast Technology घरे तयार करण्यात आले.



९.५६,०४३ घरांवर ग्रामीण गृहनिर्माण **योजनेचा लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घरकुलाची नोंद** इ. बाबींची पूर्तता करण्यात आली.

**१०.क्षेत्र अधिकारी ॲप :-** ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी **क्षेत्र अधिकारी ॲप** (Area Officer App) ची निर्मिती केली आहे. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची पाहणी करतांना ७८ अधिकाऱ्यांनी या ॲपचा वापर केला.

## अभियानाच्या अंमलबजावणीसाठी क्षमताबांधणी कार्यक्रम

**"महा आवास अभियान २०२३-२४"** च्या प्रभावी अंमलबजावणी व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी राज्यस्तरीय अभियान शुभारंभ कार्यशाळेसह राज्यात **विभागस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळा व ग्रामस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळांमध्ये अभियाना विषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे या कार्यशाळांच्या माध्यमातून अभियान यशस्वीतेसाठी उपाययोजना व नियोजन करण्यात आले.**

## ग्राम कृती गटाचे (Village Action Group) गठन

या ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये 'ग्राम कृती गटाचे गठन' करण्यात येत आहे. यामध्ये गावातील प्रभावी व्यक्ती, युवक/युवती, इत्यादींचा समावेश करत आहे. उदा. सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, शिक्षक, पोलीस इ. प्रभावी व्यक्ती. या गटाने **"महा आवास अभियान २०२३-२४"** मध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियान १०० टक्के यशस्वी करावयाचे आहे.

## लाभार्थी मेळावे

गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन, प्रोत्साहन देणे, तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण करणे, घरकुलाचे भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करणे, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम करणे, गृहप्रवेश कार्यक्रम करणे, इ. सारखे उपक्रम राबविणेत यावेत.



## बँक मेळावे

तालुकास्तरावर/ गावोगावी बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात आले.

## अभियानच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रम

'महा आवास अभियान २०२३-२४' अंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध घरकुल योजनांबाबत जन जागृती, प्रचार-प्रसिध्दी करण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद (IEC) च्या विविध उपक्रमांचा जसे- Mass मिडीया, Outdoor मिडीया, Social मिडीया, Group मिडीया, आंतरव्यक्ती संवाद (IPC), पारंपारिक मिडीया, इ. उपक्रमांचा यथोचित वापर करण्यात आला.

## अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापन

**'महा आवास अभियान २०२३-२४'** च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव स्तरावर समित्या कार्यरत राहतील. या सर्व स्तरावरील अंमलबजावणी,संनियंत्रण व मूल्यमापन समित्या राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व गावपातळीवरुन क्षमता बांधणी कार्यशाळा, आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी (Field Visits), Awaas Soft, MIS Formats, इ. द्वारे अभियानाचे संनियंत्रन व मूल्यमापन करण्यात आले.

## अभियान कालावधीतील उत्कृष्ट कार्याचा गौरव

**महा आवास अभियान १ व महा आवास अभियान २ प्रमाणे 'महा आवास अभियान २०२३-२४'** मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना **'महा आवास अभियान पुरस्कार २०२३-२४'** देऊन गौरविण्यात येईल. अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून राज्य, विभाग, जिल्हा, तालुका, ग्रामस्तरावर उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने काढण्यात येतील.



## जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांकरीता विविध कार्यक्रमांचे आयोजन

महा आवास अभियान २०२३-२४ ची प्रभावी अंमलबजावणी राज्यात सुरू असून या अभियानात महिलांचा सक्रिय सहभाग घेण्यासाठी व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी प्रचार, प्रसिध्दी व जन- जागृतीसाठी दिनांक ८ मार्च, २०२४ रोजीच्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

यामध्ये ग्रामीण आवास योजनांतर्गत घरकुल पूर्ण झालेल्या महिला लाभार्थ्यांचे एकत्रित गृहप्रवेश सोहळ्याचे आयोजन, बचत गटात समाविष्ट नसलेल्या महिला घरकुल लाभार्थ्यांचा स्वयंसहायत्ता बचत गटात समावेश, ग्रामीण आवास योजनांतर्गत ज्या महिला लाभार्थ्यांनी अद्यापपर्यंत घरकुल बांधकाम सुरु केले नाही,अशा महिला लाभार्थ्यांचा एकत्रित भूमीपूजन कार्यक्रमाचे आयोजन, ग्रामीण गवंडी प्रशिक्षणांतर्गत इच्छुक महिलांचा समावेश व गवंडी प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केलेल्या महिलांचा सत्कार, अभियानाच्या यशस्वीतेसाठी उत्स्फूर्तपणे सहभागी महिला/ लाभार्थी/ कर्मचारी/ अधिकारी/ पदाधिकारी यांचा सत्कार, महिला लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी गृहकर्ज उपलब्धतेसाठी बँक मेळाव्याचे आयोजन, पंचायत समिती आवारामध्ये पूर्ण झालेल्या डेमो हाऊसमध्ये कॉप-शॉप सुरू करण्यासाठी स्वयंसहायत्ता महिला बचत गटांना प्राधान्य, घरकुले पूर्ण झालेल्या महिला घरकुल लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून लाभ, घरकुले पूर्ण झालेल्या सर्व महिला लाभार्थ्यांच्या नावाची नोंद ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घेणे, इ. कार्यक्रम आयोजित केले.

या कार्यक्रमाला सर्व भागधारकांचा सक्रिय सहभाग मिळाला असून जागतिक महिला दिनी महिला लाभार्थ्यांच्या हस्ते भूमीपूजन व गृह प्रवेश करण्यात आले. या कार्यक्रमाच्या आयोजनामुळे महिला घरकुल लाभार्थी, ग्रामीण भागातील सर्व महिला व सर्व ग्रामस्थांना प्रोत्साहन मिळाले आहे. यामुळे विविध घरकुल योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या कामात महिलांचा सक्रिय सहभाग असून घरकुल योजनांच्या कामात गतिमानता आली आहे.



# मा. उप मुख्यमंत्री यांचे पंचायत समिती सभापती यांना अभियानात सक्रिय सहभाग घेण्याबाबत पत्र



**उप मुख्यमंत्री**
**महाराष्ट्र राज्य**

**विषय :- महा आवास अभियान २०२३-२४ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत...**

ग्रामीण भागातील बेघर व कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या कुटुंबाचे पक्या घरात वास्तव्याचे स्वप्न पूर्ण व्हावे व त्यांचे राहणीमान उंचवावे, या हेतूने केंद्र शासनाने "सर्वांसाठी घरे- २०२४" या धोरणाचा स्वीकार केला असून राज्य शासनाने देखील हे धोरण अंगीकृत केले आहे. राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना इ. ग्रामीण घरकुल योजना पूर्ण क्षमतेने राबविण्यात येत आहेत.

गेल्या ३ वर्षापासून राबवित असलेल्या "महा आवास अभियान" मध्ये आपण दिलेल्या योगदानाबद्दल अभिनंदन. याला अनुसरुन यावर्षीही सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२४ या कालावधीमध्ये "महा आवास अभियान २०२३-२४" राबविण्यात येत आहे. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ, मा. मंत्री, ग्राम विकास, यांच्या शुभहस्ते व मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

आपल्या जिल्हयातील सर्व पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळणेसाठी, हे अभियान जिल्ह्यांतील सर्व तालुके व ग्रामपंचायतीमध्ये लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या सहभागातुन लोक चळवळ म्हणून राबविले जाईल याचे आपण नियोजन करावे. अभियानाच्या शासन निर्णयात दिल्याप्रमाणे प्रामुख्याने १० उपक्रमांवर विशेष लक्ष द्यावे. यासाठी पुढील बाबींवर प्राधान्याने लक्ष द्यावे.

१. घरकुलांच्या उद्दिष्टानुसार १०० टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलांना विनाविलंब मंजूरी दयावी व मंजूर केलेली सर्व घरकुले १०० टक्के पूर्ण होतील याचे नियोजन करावे.
२. भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी गावोगावी लँण्ड बँक उभारण्यासाठी चळवळ उभी करावी.

**उप मुख्यमंत्री**
**महाराष्ट्र राज्य**

३. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित सर्व अधिकाऱ्यांच्या समन्वयाने लाभार्थ्यांना घरकुलासाठी वाळू उपलब्ध होण्यासाठी गावोगावी सँण्ड बँक ची निर्मिती करावी.
४. बहुमजली गृहसंकूले (हाऊसिंग अपार्टमेंट) उभारुन त्यांच्या सहकारी संस्था उभाराव्यात.
५. घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान इ. चा वापर करणेसाठी लाभार्थींना प्रोत्साहीत करावे.
६. ग्रामीण भागात बांधकाम साहित्य गावोगावी सहज उपलब्ध होण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून घरकूल मार्ट सुरु करावेत.
७. घरकुल बांधकामा बरोबर किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग इ. चा वापर करावा.
८. घरकुलांना व त्यांच्या वसाहती अंतर्गत रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, पथदिवे. इत्यादी मूलभूत सुविधा द्याव्यात.
९. घरकुल लाभार्थ्यांना मूलभूत सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पंचायत समिती सेसफंड व १५ वा वित्त आयोग यातून निधीची व्यवस्था करणे करिता प्रयत्न करावा.

या अभियानामध्ये आपण केलेल्या कामाचे मुल्यमापन करण्यात येऊन उत्कृष्ठ काम करणाऱ्या जिल्ह्यांना, तालुक्यांना व ग्रामपंचायतींना राज्यस्तरावरुन पुरस्कार देण्यात येणार आहेत. यास्तव हा पुरस्कार मिळवून आपल्या जिल्हयाचे नाव उंचावण्याची संधी तुम्हांस या निमित्ताने मिळत आहे. त्याचे आपण सोने कराल याची खात्री वाटते.

"अभियान यशस्वी होणेकरिता आपणांस मनःपूर्वक शुभेच्छा"!

(अजित पवार)

प्रति,
श्री/श्रीमती. ---------------------
सभापती,
पंचायत समिती ----------------
जिल्हा परिषद,-----------------

# मा. मंत्री, महसूल यांचे तहसिलदार यांना अभियानात सक्रिय सहभाग घेण्याबाबत पत्र



**मंत्री**
**महसूल, पशुसंवर्धन,**
**दुग्ध व्यवसाय विकास**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक :

**विषय :- "महा आवास अभियान २०२३-२४" मध्ये सक्रीय सहभाग घेणेबाबत.**

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहूजन कल्याण विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बेघरांना घर देण्यासाठी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना अशा अनेक योजना राबवित आहे. या ग्रामीण गृहनिर्माण योजनांबरोबरच जागा नसलेल्या लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामुल्य उपलब्ध करुन देणे व अतिक्रमणे नियमानुकूल करणे या योजना राबविण्यात येत आहेत.

राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात सुरु असलेल्या कामास अधिक गती देण्यासाठी, त्यातील गुणवत्तावाढीसाठी **दिनांक २० नोव्हेंबर २०२३ ते ३१ मार्च २०२४** या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या **'महा आवास अभियान २०२३-२४'** या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ, मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या शुभहस्ते व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करुन अभियान यशस्वी करण्याचे आवाहन माननीय मंत्री, ग्राम विकास महोदय यांनी केले आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी आपण सक्रिय सहभाग दर्शवाल याची मला खात्री आहे.

**अभियान कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण योजना संबंधित अनेक उपक्रम राबविले जात असून या सर्व उपक्रमांप्रमाणेच खालील उपक्रमांमध्ये आपला पुढाकार महत्वपूर्ण राहील.**

१. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर **विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची 'लॅण्ड बँक' तयार करणे.**

**मंत्री**
**महसूल, पशुसंवर्धन,**
**दुग्ध व्यवसाय विकास**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक :

२. गावठाणाबाहेरील अतिक्रमणे नियमानुकूल करणे.
३. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे **'सॅण्ड बँक' ची निर्मिती करणे.**
४. **प्रधानमंत्री उज्ज्वला योजने** मधून ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे लाभार्थी यांना गॅस जोडणी उपलब्ध करुन देणे.
५. गरजे प्रमाणे इच्छूक लाभार्थ्यांना वित्तीय संस्थांकडून गृहकर्ज मिळवूण देणे.
६. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांना विहीत कालावधीत घरकुल बांधून पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहित करणे.

महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१ व महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ मध्ये उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती व संस्था यांना **राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार** देवून गौरविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या अभियानातही चांगले काम करणाऱ्यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कामाचा गौरव करण्यात येणार आहे. आपण पुरस्कार विजेते ठरुन आपल्या विभागाचे, कार्यालयाचे तसेच तालुक्याचे नाव उंचावण्याची संधी सोडणार नाही याची मला खात्री वाटते.

**'महा आवास अभियान २०२३-२४'** च्या यशस्वी वाटचालीसाठी माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा!

**( राधाकृष्ण विखे-पाटील )**
**मंत्री, महसूल**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रति,**
**श्री/श्रीमती** ______________
**तहसिलदार,**
**तालुका** ____________, **जिल्हा** ____________.

## मा. मंत्री, महसूल यांचे तलाठी यांना अभियानात सक्रिय सहभाग घेण्याबाबत पत्र



मंत्री
महसूल, पशुसंवर्धन,
दुग्ध व्यवसाय विकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक :

**विषय :- "महा आवास अभियान २०२३-२४" मध्ये सक्रीय सहभाग घेणेबाबत.**

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहूजन कल्याण विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बेघरांना घर देण्यासाठी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना अशा अनेक योजना राबवित आहे. या ग्रामीण गृहनिर्माण योजनांबरोबरच जागा नसलेल्या लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामुल्य उपलब्ध करुन देणे व अतिक्रमणे नियमानुकूल करणे या योजना राबविण्यात येत आहेत.

राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात सुरु असलेल्या कामास अधिक गती देण्यासाठी, त्यातील गुणवत्तावाढीसाठी **दिनांक २० नोव्हेंबर २०२३ ते ३१ मार्च २०२४** या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या '**महा आवास अभियान २०२३-२४**' या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ, मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या शुभहस्ते व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करुन अभियान यशस्वी करण्याचे आवाहन माननीय मंत्री, ग्राम विकास महोदय यांनी केले आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी आपण सक्रिय सहभाग दर्शवाल याची मला खात्री आहे.

**अभियान कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण योजना संबंधित अनेक उपक्रम राबविले जात असून या सर्व उपक्रमांप्रमाणेच खालील उपक्रमांमध्ये आपला पुढाकार महत्वपूर्ण राहील.**

१. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर **विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची 'लॅण्ड बँक' तयार करणे.**

मंत्री
महसूल, पशुसंवर्धन,
दुग्ध व्यवसाय विकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक :

२. गावठाणाबाहेरील अतिक्रमणे नियमानुकूल करणे.
३. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे **'सॅण्ड बँक' ची निर्मिती करणे.**
४. **प्रधानमंत्री उज्ज्वला योजने** मधून ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे लाभार्थी यांना गॅस जोडणी उपलब्ध करुन देणे.
५. गरजे प्रमाणे इच्छूक लाभार्थ्यांना वित्तीय संस्थांकडून गृहकर्ज मिळवूण देणे.
६. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांना विहीत कालावधीत घरकुल बांधून पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहित करणे.

महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१ व महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ मध्ये उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती व संस्था यांना **राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार** देवून गौरविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या अभियानातही चांगले काम करणाऱ्यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कामाचा गौरव करण्यात येणार आहे. आपण पुरस्कार विजेते ठरुन आपल्या विभागाचे, कार्यालयाचे तसेच तालुक्याचे नाव उंचावण्याची संधी सोडणार नाही याची मला खात्री वाटते.

**'महा आवास अभियान २०२३-२४'** च्या यशस्वी वाटचालीसाठी माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा!

**( राधाकृष्ण विखे-पाटील )**
**मंत्री, महसूल**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रति,**
**श्री/श्रीमती ________**
**तलाठी,**
**सजा ________**

## मा. मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज यांचे सरपंच यांना अभियानात सक्रिय सहभाग घेण्याबाबत पत्र



**मंत्री**
**ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
***www.maharashtra.gov.in***

दिनांक :

**विषय -" महा आवास अभियान २०२३-२४" मध्ये सक्रीय सहभाग घेणेबाबत...**

आपणास अवगतच आहे की, सर्वांसाठी घरे-२०२४ या शासनाच्या धोरणांतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतीमान करणे व त्यामध्ये गुणवत्ता आणणे यासाठी राज्यात सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या कालावधीत **महा आवास अभियान** राबविण्यात आले. या सर्व अभियानास उत्तम प्रतिसाद लाभला असून, अभियान यशस्वी होणेमध्ये आपला सहभाग निश्चितच अमूल्य असा आहे. अभियान चळवळ अशीच पुढे नेण्याच्या हेतूने, यावर्षी देखिल **दिनांक २० नोव्हेंबर २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत "महा आवास अभियान २०२३-२४"** राज्यात राबविण्याचा संकल्प ग्राम विकास व पंचायत राज विभागाने केला आहे.

सरपंच व ग्रामसेवक हा ग्राम विकासाचा कणा आहे. ग्रामीण भागासाठीच्या प्रत्येक योजनेची अंमलबजावणी आपल्या शिवाय होऊच शकत नाही. आणि त्यामुळेच या अभियानामध्ये आपली भूमिका अतिशय महत्त्वाची आणि निर्णायक असणार आहे. **त्यासाठी अभियान कालावधीमध्ये राबवण्याच्या विविध उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आपण आपला सक्रीय सहभाग पुढीलप्रमाणे नोंदवावा.**

१. महा आवास अभियान २०२३-२४ आपल्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामस्तरीय कार्यशाळा आयोजित करुन लाभार्थी व ग्रामस्थांची क्षमता बाधंणी करणे.
२. ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व लाभार्थी यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करुन गावातील कामाचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण करणेसाठी तसेच अभियान १०० टक्के यशस्वी करण्यासाठी ग्राम कृती गटाचे गठन करणे.
३. गावात लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांच्या बैठका, मेळावे आयोजित करुन घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन, प्रोत्साहन देणे तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण करणे, घरकुलाचे भुमिपुजन कार्यक्रम, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम, गृहप्रवेश कार्यक्रम, इ. कार्यक्रमांचे आयोजन करणे.
४. गावामध्ये बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बाधकामासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करणे.

**मंत्री**
**ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
***www.maharashtra.gov.in***

दिनांक :

५. भुमिहिन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध मार्गाने उपलब्ध होणाऱ्या जागांची **लॅण्ड बँक** तयार करणे. तसेच वाळू उपलब्धतेसाठी **सॅण्ड बँक**ची निर्मिती करणे.
६. तसेच सर्व घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या इतर योजनांचा लाभ मिळवून देऊन शासन निर्णयातील परिशिष्टात दिलेल्या निकषावर काम करुन आपली ग्रामपंचायत राज्यस्तरावरील पुरस्कारासाठी पात्र ठरावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.
७. अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांचा यथोचित वापर करावा.

आपणास माहित असेल की, समाजातील अनेक व्यक्ती किंवा संस्था स्वतःचे योगदान देऊन तसेच आर्थिक झळ सोसून अशा प्रकारे समाजसेवा करण्याची संधी शोधत असतात. मात्र आपण निश्चितच भाग्यवान आहात, की ग्रामीण भागातील गोरगरीब, दीनदुबळ्या जनतेची सेवा अशा प्रकारच्या शासकीय योजनेद्वारे आपल्या हातून आयतीच घडत आहे, आणि ती देखील कोणतीही वैयक्तिक झळ न सोसता! ही जाणीव ठेऊनच आपण सदर अभियाना दरम्यान आपणास दिलेले संपूर्ण उद्दिष्ट पूर्ण कराल याची मला खात्री आहे. याही वेळी आपण अथक परिश्रम करुन आपल्या ग्रामपंचायतीस पुरस्कार मिळवून द्याल, असा विश्वास वाटतो.

**महा आवास अभियान-ग्रामीणच्या यशस्वीतेसाठी आपणास माझ्याकडून मन:पूर्वक शुभेच्छा..!**

(गिरीष महाजन)

**प्रति,**
**श्री/श्रीम........................................**
**सरपंच,**
**ग्रामपंचायत ........................................**
**तालुका -------------, जिल्हा -----------------**

## मा. मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज यांचे ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांना अभियानात सक्रिय सहभाग घेण्याबाबत पत्र



मंत्री
ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक :

**विषय -" महा आवास अभियान २०२३-२४" मध्ये सक्रीय सहभाग देणेबाबत...**

आपणास अवगतच आहे की, सर्वांसाठी घरे-२०२४ या शासनाच्या धोरणांतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतीमान करणे व त्यामध्ये गुणवत्ता आणणे यासाठी राज्यात सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या कालावधीत **महा आवास अभियान** राबविण्यात आले. या सर्व अभियानास उत्तम प्रतिसाद लाभला असून, अभियान यशस्वी होणेमध्ये आपला सहभाग निश्चितच अमूल्य असा आहे. अभियान चळवळ अशीच पुढे नेण्याच्या हेतूने, यावर्षी देखिल **दिनांक २० नोव्हेंबर २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत "महा आवास अभियान २०२३-२४"** राज्यात राबविण्याचा संकल्प ग्राम विकास व पंचायत राज विभागाने केला आहे.

सरपंच व ग्रामसेवक हा ग्राम विकासाचा कणा आहे. ग्रामीण भागासाठीच्या प्रत्येक योजनेची अंमलबजावणी आपल्या शिवाय होऊच शकत नाही. आणि त्यामुळेच या अभियानामध्ये आपली भूमिका अतिशय महत्त्वाची आणि निर्णायक असणार आहे. **त्यासाठी अभियान कालावधीमध्ये राबवण्याच्या विविध उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आपण आपला सक्रीय सहभाग पुढीलप्रमाणे नोंदवावा.**

१. महा आवास अभियान २०२३-२४ आपल्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामस्तरीय कार्यशाळा आयोजित करुन लाभार्थी व ग्रामस्थांची क्षमता बाधंणी करणे.
२. ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व लाभार्थी यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करुन गावातील कामाचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण करणेसाठी तसेच अभियान १०० टक्के यशस्वी करण्यासाठी ग्राम कृती गटाचे गठन करणे.
३. गावात लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांच्या बैठका, मेळावे आयोजित करुन घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन, प्रोत्साहन देणे तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण करणे, घरकुलाचे भुमिपुजन कार्यक्रम, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम, गृहप्रवेश कार्यक्रम, इ. कार्यक्रमांचे आयोजन करणे.

मंत्री
ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक :

४. गावामध्ये बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करणे.
५. भुमिहिन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध मार्गाने उपलब्ध होणाऱ्या जागांची **लॅण्ड बँक** तयार करणे. तसेच वाळू उपलब्धतेसाठी **सॅण्ड बँक**ची निर्मिती करणे.
६. तसेच सर्व घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या इतर योजनांचा लाभ मिळवून देऊन शासन निर्णयातील परिशिष्टात दिलेल्या निकषावर काम करुन आपली ग्रामपंचायत राज्यस्तरावरील पुरस्कारासाठी पात्र ठरावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.
७. अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांचा यथोचित वापर करावा.

आपणास माहित असेल की, समाजातील अनेक व्यक्ती किंवा संस्था स्वतःचे योगदान देऊन तसेच आर्थिक झळ सोसून अशा प्रकारे समाजसेवा करण्याची संधी शोधत असतात. मात्र आपण निश्चितच भाग्यवान आहात, की ग्रामीण भागातील गोरगरीब, दीनदुबळ्या जनतेची सेवा अशा प्रकारच्या शासकीय योजनेद्वारे आपल्या हातून आयतीच घडत आहे, आणि ती देखील कोणतीही वैयक्तिक झळ न सोसता! ही जाणीव ठेऊनच आपण सदर अभियाना दरम्यान आपणास दिलेले संपूर्ण उद्दिष्ट पूर्ण कराल याची मला खात्री आहे. याही वेळी आपण अथक परिश्रम करुन आपल्या ग्रामपंचायतीस पुरस्कार मिळवून द्याल, असा विश्वास वाटतो.

**महा आवास अभियान-ग्रामीणच्या यशस्वीतेसाठी आपणास माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा..!**

(गिरीष महाजन)

प्रति,
श्री/श्रीम......................................................
ग्राम विकास अधिकारी/ग्रामसेवक,
ग्रामपंचायत.......................... तालुका -------------, जिल्हा -----------------

## मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे विभागीय आयुक्त यांना अभियानात सक्रिय सहभाग घेण्याबाबत पत्र



**डॉ. नितिन करीर**
**मुख्य सचिव**

क्र.प्रआयो-२०२३/प्र.क्र.२३६(२०)/यो-१०
राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण
ग्रामविकास विभाग
दिनांक : १७ जानेवारी, २०२४

**विषय :- महा आवास अभियान २०२३-२४ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत.**

"सर्वांसाठी घरे-२०२४" हे केंद्र शासनाचे धोरण असून राज्य शासनानेदेखील या धोरणाचा स्विकार केला आहे.

ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी राज्य शासनाने **"महा आवास अभियान २०२३-२४" दिनांक २० नोव्हेंबर २०२३** पासून राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानांतर्गत केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी मिशन मोडमध्ये करण्यासाठी **अभियानाच्या उपक्रमांवर विशेष लक्ष देवून पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

१. सदर अभियान यशस्विपणे राबविण्यासाठी ग्रामीण गृहनिर्माण हा विषय आपले विषयपत्रिकेवर अग्रक्रमाने घ्यावा.
२. विभागीय टास्क फोर्सचे अध्यक्ष या नात्याने विभागातील भूमिहीन घरकुल लाभार्थ्यांना जागा देण्यासाठी युध्दपातळीवर कार्यवाही करावी.
३. गतिमान घरकुल बांधणीसाठी लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध होणेसाठी महसूल यंत्रणेस (जिल्हाधिकारी/प्रांत अधिकारी/ तहसिलदार/ तलाठी) सूचित करावे.
४. महा आवास अभियानाचा नियमित साप्ताहीक आढावा घेऊन संबंधितांना मार्गदर्शन करावे.
५. या अभियानांतर्गत राबवावयाचे उपक्रम हे ग्राम विकास विभाग, महसूल विभाग व इतर विभागांशी संबंधित असून त्या विभागांमध्ये समन्वय साधावा.

या अभियानात उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचारी इत्यादींना राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरुन पुरस्कार देण्यात येणार आहेत. आपल्या मार्गदर्शनाखाली महा आवास अभियान २०२३-२४ यशस्वीरित्या राबविण्याबाबत आपण व्यक्तीशः लक्ष घालावे, शुभेच्छांसह..!

(डॉ. नितीन करीर)

विभागीय आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)

# मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग यांचे जिल्हाधिकारी यांना अभियानात सक्रिय सहभाग घेण्याबाबत पत्र

डॉ. राजगोपाल देवरा
अपर मुख्य सचिव (महसूल)



महसूल व वन विभाग
पत्र क्र.जा.क्र.प्रआयो-२०२३/प्र.क्र.२३६(२१)/यो-१०
दिनांक :- २५ जानेवारी, २०२४

विषय :- महा आवास अभियान २०२३-२४ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत...

"सर्वांसाठी घरे-२०२४" हे केंद्र शासनाचे धोरण असून राज्य शासनानेदेखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना–ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत. या धोरणाच्या अनुषंगाने पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमणे नियमानुकूल करणे व लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करुन देणे अशा प्रकारचे पूरक कार्यक्रमसुध्दा राज्यात राबविण्यात येत आहेत. यास्तव सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ यावर्षामध्ये महा आवास अभियान राबविण्यात आले. सदर अभियानात सक्रीय सहभागी होऊन केलेल्या कामाबद्दल प्रथमतः आपले मनःपूर्वक अभिनंदन! यावर्षी देखील राज्यात **दिनांक २० नोव्हेंबर २०२३ ते दिनांक ३१ मार्च २०२४ या कालवधीत "महा आवास अभियान २०२३-२४"** राबविण्याचा निर्णय ग्राम विकास व पंचायत रा विभागाने घेतला आहे. या अभियानास देखील भरघोस प्रतिसाद आपणाकडून मिळेल, ही अपेक्षा आहे.

महा आवास अभियान २०२३-२४ अंतर्गत राबवावयाच्या १० उपक्रमांबाबतची माहिती ग्राम विकास विभाग यांचेकडील दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. या अभियानातील सर्व १० उपक्रम राबविताना आपण पुढाकार घेऊन जिल्हा यंत्रणेस मार्गदर्शन करावे. विशेषतः पुढील उपक्रमांमध्ये आपला सक्रीय सहभाग आवश्यक आहे. आपल्या कार्यालयाकडून खालील बाबींवर कार्यवाही करुन त्याच्या अंमलबजावणीबाबत दैनंदिन आढावा घेवून अभियान यशस्वी होण्याकरिता सक्रिय सहभाग घ्यावा.

- जागा नसलेल्या लाभार्थ्यांच्या घरकुलांसाठी शासकीय जागा विनामुल्य उपलब्ध करणे.
- ग्रामीण भागातील गावठाणाबाहेरील अतिक्रमणे नियमानुकूल करणे.
- घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यास ५ ब्रास वाळू विना रॉयल्टी उपलब्ध करुन देणे.
- घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्याला बँकेकडून रू. ७०,०००/- चे कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी DLBC (District Level Bankers Committee) द्वारे मदत करणे.
- शासकीय योजनांशी कृतीसंगम, तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करणे.
- अभियानामध्ये समाजातील सर्व घटक जसे - शासकीय यंत्रणा, पंचायतराज संस्था, कॉर्पोरेट संस्था, स्वयंसेवी संस्था, लोक प्रतिनिधी व लाभार्थी इत्यादी सर्वांचा सक्रीय सहभाग मिळविणे.

या अभियानांतर्गत ग्रामीण गृहनिर्माण संबंधित केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात विशेष प्रयत्न करुन या योजनांची अंमलबजावणी मिशन मोडमध्ये करण्यात यावी. महा आवास अभियान २०२०-२१ व महा आवास अभियान २०२१-२२ मध्ये उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती व संस्था यांना **राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार** देवून गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे या अभियानात उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचारी इत्यादींना राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरुन पुरस्कार देण्यात येणार आहेत. "सर्वासाठी घरे-२०२४" या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून सदर अभियान यशस्वी करण्यासाठी व आपल्या जिल्ह्यास पुरस्कार मिळण्यासाठी आपण व्यक्तीशः लक्ष घालावे.

अपर मुख्य सचिव,
(महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी)
महसूल व वन विभाग
महाराष्ट्र शासन

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),

# मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अभियानात सक्रिय सहभाग घेण्याबाबत पत्र

एकनाथ डवले, भा.प्र.से.
प्रधान सचिव



ग्रामविकास व पंचायत राज विभाग
अ.शा.पत्र क्र. 236 (22) / यो-10
दिनांक :- १६ जानेवारी, २०२४

विषय :- महा आवास अभियान-ग्रामीण २०२३-२४ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत...

प्रिय

"सर्वांसाठी घरे-२०२४" हे केंद्र शासनाचे धोरण असून राज्य शासनानेदेखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच तसेच रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना इत्यादी राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. या धोरणाच्या अनुषंगाने पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमणे नियमानुकूल करणे व लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून देणे अशा प्रकारचे पूरक कार्यक्रमसुध्दा राज्यात राबविण्यात येत आहेत.

ग्रामीण गृहनिर्माणचे धोरण राबविताना घरकुलांच्या कामाची प्रगती संख्यात्मक न राहता गुणात्मक राहावी, तसेच नाविन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधायुक्त असे घरकुल उपलब्ध करुन दयावे, त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारे घरकुल बांधण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा या बाबी प्रकर्षाने विचारात घेण्यात येत आहेत.

राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणणेसाठी सन २०२०-२१, सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या कालावधीत महा आवास अभियान राबविण्यात आले. सदर महा आवास अभियान राबविताना आपण व आपले अधिनस्त संबंधित सहकाऱ्यांनी सक्रिय सहभाग देवून हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले, त्याबद्दल आपले व आपल्या सहकार्यांचे अभिनंदन..!

राज्यात ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी तसेच गेल्या तीन वर्षात महा आवास अभियानाला प्राप्त झालेला प्रतिसाद विचारात घेवून राज्य शासनाने **महा आवास अभियान २०२३-२४ दिनांक २० नोव्हेंबर २०२३ ते ३१ मार्च २०२४** या कालावधीत राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने **अभियानाच्या शासन निर्णयात दिल्याप्रमाणे प्रामुख्याने पुढील १० उपक्रमांवर विशेष लक्ष द्यावे.**

१. **भूमीहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामसाठी विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून जागा उपलब्ध करुन देणे.**
२. **घरकुलांच्या उद्दिष्टाप्रमाणे सर्व घरकुलांना विनाविलंब १०० टक्के मंजूरी देणे.**
३. **मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वितरण करणे. त्याकरिता घरकुलास मंजूरी दिलेल्या लाभार्थ्यांना ७ दिवसाच्या आत पहिल्या हप्त्याते वितरण करुन** पुढील हप्ते घरकुलांच्या भौतिक प्रगतीनुसार विनाविलंब वितरीत करणे.
४. **सर्व मंजूर घरकुले भौतिक व आर्थिकदृष्ट्या पूर्ण करणे. तसेच मंजूर केलेली सर्व घरकुले किमान कालावधीत व गतीने पूर्ण करुन घरकुल बांधकामाच्या भौतिक प्रगतीनुसार टप्पा निहाय सर्व हप्ते किमान कालावधीत वितरीत करणे.**
५. **प्रलंबित घरकुले पूर्ण करणे.** यासाठी घरकुले प्रलंबित राहण्यामागच्या कारणांवर उपाययोजना करणे, गरजेप्रमाणे 'लोक अदालत' वा इतर मार्गाने लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांना प्रवृत्त करणे. तसेच पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले Refund करुन Remand करणे.
६. **ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे. तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांचे ग्रामपंचायत निहाय पॅनल तयार करुन ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या घरकुल बांधकामात सहभाग घेणे.**
७. जागांची कमतरता व जागांच्या किमती यांचा विचार करून कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी लाभार्थ्यांच्या एकत्रित निधीतून जागा खरेदी करणे व त्याद्वारे त्यांच्या बहुमजली इमारती, गृहसंकुले व अपार्टमेंट द्वारे घरांचे स्वप्न पूर्ण करणे.
८. लाभार्थ्यांना मार्गदर्शनासाठी जिल्हास्तरीय डेमो हाऊसेस, तालुकास्तरीय डेमो हाऊसेसला लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटी आयोजित करणे. या व्यतिरीक्त प्रत्येक डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी कॉप-शॉप (Co-op Shop) सुरु करणे.
९. **शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगमातून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनातील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावणे. तसेच दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्रामपंचायत सेस, सीएसआर निधी इत्यादींच्या माध्यमातून लाभार्थ्यांना मूलभूत नागरी सुविधा जसे अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे इत्यादी उपलब्ध करुन देणे.**
१०. **ग्रामीण गृहनिर्माण योजनांचया अंमलबजावणीमध्ये गतिमाणता व गुणवत्ता आणण्यासाठी राज्यात लॅण्ड बँक, सॅण्ड बँक निर्मिती करणे, घरकुल मार्ट सुरू करणे, गृहकर्ज उपलब्धतेसाठी सहकार्य करणे, मॉडेल हाऊसेसची उभारणी करणे, घरकुल बांधकामात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे,** पथदर्शी प्रकल्प म्हणून Precast Technology घरकुले उभारणे, घरावर ग्रामीण गृहनिर्माण योजनेचा लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये नोंद घेणे व क्षेत्र अधिकारी ॲपचा जास्तीत जास्त वापर करणे, इ. नावीन्यपूर्ण उपक्रम अभियानात राबविण्यात येत आहे.

या अभियानात उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचारी इत्यादींना राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरुन पुरस्कार देण्यात येणार आहेत. या संदर्भात पुरस्कार प्राप्त करून घेण्यासाठी सक्रिय सहभाग आवश्यक आहे. "सर्वांसाठी घरे-२०२४" या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करण्यासाठी व सदर अभियान यशस्वी करण्यासाठी आपण व्यक्तीशः लक्ष घालावे. ग्रामीण गृहनिर्माण हा विषय आपल्या अग्रक्रमावर ठेवून सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचा सक्रीय सहभाग कायम राहील याची दक्षता घ्यावी.

*शुभेच्छांसह!*

एकनाथ डवले, भा.प्र.से.

प्रति,
अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

## मा.प्रधानमंत्री, श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते मोदी आवास घरकुल योजनेचा शुभारंभ व मोदी आवास घरकुल योजनेच्या २ लाख ५० हजार लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण

दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी देशाचे मा.प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते विविध विकास कामांचा लोकार्पण समारंभ यवतमाळ येथे संपन्न झाला. याप्रसंगी राज्यात इतर मागास व बहुजन कल्याण विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या 'मोदी आवास घरकुल योजनेचा' शुभारंभ व या योजनेंतर्गत मंजुर २ लाख ५० हजार घरकुल लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे रक्कम रूपये ३७५ कोटीचे वितरण मा.प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते व मा.राज्यपाल श्री.रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. तसेच याप्रसंगी या योजनेच्या प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय निर्मित फिल्मचे प्रसारण केले.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे, मा.उप मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस, मा.उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार, मा.मंत्री, इतर मागास व बहुजन कल्याण श्री.अतुल सावे, मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्यासह, पदाधिकारी, लोक प्रतिनिधी, विविध विभागाचे अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

राज्यात ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गासोबतच विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी "मोदी आवास घरकुल योजना" राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत सन २०२३-२४ मध्ये ३ लाख, सन २०२४-२५ मध्ये ३ लाख व सन २०२५-२६ मध्ये ४ याप्रमाणे पुढील ३ वर्षामध्ये १० लाख पात्र लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ देण्यात येत आहे. या करीता इतर मागास व बहुजन कल्याण विभागांतर्गत रू.१२,००० कोटी निधीची तरदुत केली आहे.

राज्यस्तरावरून या योजनेची अंमलबजावणी, संनियंत्रण व समन्वय ग्राम विकास विभागांतर्गत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण यांचे मार्फत होत असून जिल्हा पातळीवर प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेमार्फत करण्यात येत आहे.





## मा.मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते ग्रामीण गृहनिर्माण योजनेचे लाभार्थी सन्मानीत

महिला स्वयंसहाय्यता बचत गटांकडून उत्पादित वस्तूंचे 'विभागस्तरीय ताराराणी विक्री प्रदर्शन' कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आले होते. दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२४ रोजी या विक्री प्रदर्शनाचे उद्‌घाटन मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते व मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य तथा पालकमंत्री, कोल्हापूर जिल्हा श्री.हसन मुश्रीफ यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत घरकुले पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांना मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची चावी देवून सन्मानीत करण्यात आले.

याप्रसंगी मा.कार्यकारी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळ श्री.राजेश क्षीरसागर, मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र कृषी, शिक्षण व संशोधन परिषद,पुणे श्री.प्रकाश आबिटकर, मा.खासदार श्री.धनंजय महाडिक, मा.खासदार श्री.संजय मंडलिक, मा.खासदार श्री.धैर्यशिल माने, विभागीय आयुक्त श्री.सौरभ राव, जिल्हाधिकारी श्री.राहुल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संतोष पाटील, प्रकल्प संचालक श्रीमती सुषमा देसाई यांच्यासह पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, सर्व विभागांचे अधिकारी व लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मा.प्रधानमंत्री, श्री. नरेंद्र मोदी यांचा दूरदृष्य प्रणालीद्वारे प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान लाभार्थ्यांशी संवाद

मा. प्रधानमंत्री महोदयांनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०२३ रोजी जनजाती गौरव दिनानिमित्त प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महा अभियान (PM-JANMAN) सुरु केले आहे. देशातील ७५ विशेषतः असुरक्षित आदीवासी गटांचा विकास करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. तसेच भारत सरकारने प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) ला ९ मंत्रालयांद्वारे ११ विशेष बाबींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी मान्यता देखील दिली आहे. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महा अभियान (PM-JANMAN) अंतर्गत आदिम जमातीतील पात्र कुटुंबांसाठी देशात ४.९० लाख लाभार्थ्यांना मुलभूत सुविधांसह पक्की घरे बांधण्यासाठी प्रती घरकुल रु. २.३९ लाख (घरकुल अनुदान २.०० लाख, रु.१२,०००/- SBM-G आणि मनरेगा अंतर्गत ९०/९५ दिवसांचे अकुशल वेतन रु. २७,०००/- अंदाजे) अशी तरतूद केली आहे. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM- JANMAN) अंतर्गत विशेषतः असुरक्षित आदीवासी (कोलाम, कातकरी व माडीया गोंड इ.) संवर्गातील लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्याबाबत आदर्श कार्यपध्दती प्राप्त झाली आहे.

या विषयी दिनांक १५ जानेवारी, २०२४ रोजी प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) अंतर्गत लाभार्थ्यांशी मा.प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांनी दूरदृष्य प्रणालीव्दारे संवाद साधला. यावेळी नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील लाभार्थ्यांनी आपले मनोगत सांगितले. त्यानंतर मा.प्रधानमंत्री महोदयांनी प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM- JANMAN) विषयी सविस्तर मार्गदर्शन करत सर्वांची क्षमता बांधणी केली.




# राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांची क्षमता बांधणी कार्यशाळा

**"सर्वांसाठी घरे-२०२४"** हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध योजना राबविण्यात येत आहेत. या सर्व योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संनियंत्रण व मूल्यमापन, क्षमता बांधणी, माहिती, शिक्षण व संवाद, समन्वय व केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी पॉलीसी इनपुट देणे, इ. उपक्रम या कार्यालयाच्या मार्फत राबविण्यात येतात.



या विषयांची सविस्तर माहिती राज्य व्यवस्थापन कक्षातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना व्हावी, याकरीता दिनांक १४ व १५ मार्च, २०२४ रोजी कर्जत येथे निवासी क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेमध्ये दिनांक १४ मार्च, २०२४ रोजी सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनाची माहिती, लाभार्थी निवड प्रक्रीया, बांधकामाचे टप्पे, ग्रामीण गृहनिर्माण योजनांची सद्यस्थिती, आस्थापना विषयक बाबी, सर्व स्तरावरील पत्रव्यवहार, माहितीचा अधिकार, आवास सॉफ्ट प्रणाली हाताळणे, अहवाल सादरीकरण व लेखा विषयक बाबीं, इ. विषयांवर उपसंचालक श्री.नीलेश काळे, उपसंचालक श्रीमती राजलक्ष्मी येरपुडे, सहाय्यक संचालक (लेखा) श्रीमती अपर्णा पाटणे यांनी सखोल मार्गदर्शन केले.

त्याचप्रमाणे दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी कर्जत तालुक्यातील गावांमध्ये विविध घरकुल योजनांतर्गत प्रगतीत असलेल्या व बांधकाम पूर्ण झालेल्या घरकुलांना क्षेत्रीय भेटी देवून प्रत्यक्ष कामाची पाहणी व लाभार्थ्यांशी संवाद साधला.




## मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली बैठका

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२४ या कालावधीत महा आवास अभियान २०२३-२४ राबविण्यात आले. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्या उपस्थितीत माहे जानेवारी ते मार्च २०२४ या कालावधीत विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांच्या आढावा बैठका घेण्यात आल्या.

या आढावा बैठकांमध्ये केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांसह महा आवास अभियानाचा उपक्रमनिहाय आढावा घेण्यात आला. यावेळी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी महा आवास अभियान २०२३-२४ व गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीबाबत सादरीकरण केले.

या बैठकीमध्ये मोदी आवास घरकुल योजनेतील सर्व लाभार्थ्यांना १००% मंजूरी देणे, PM-JANMAN प्रमाणे मोदी आवास योजनेत काम करणे, सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनेंतर्गत घरकुलांना तात्काळ मंजूरी देणे व प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सर्व घरकुले दि. ३१ मार्च, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांनी सुचित केले. तसेच शबरी आवास योजनेतील प्रलंबित मंजूरी बाबत मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग यांनी नाराजी व्यक्त केली. याबाबत आदिवासी विकास विभागास पत्र देण्याचे संबंधितांना मा.प्रधान सचिव यांनी सूचित केले.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 15 | AHMEDNAGAR | 493.334 | 478.489 | 14.845 | 94.05 |
| 16 | SANGLI | 131.674 | 116.765 | 14.909 | 79.36 |
| 17 | SATARA | 218.295 | 203.020 | 15.275 | 86.86 |
| 18 | HINGOLI | 139.551 | 123.912 | 15.639 | 79.94 |
| 19 | CHANDRAPUR | 263.794 | 246.305 | 17.489 | 88.20 |
| 20 | AURANGABAD | 209.254 | 191.041 | 18.213 | 85.02 |
| 21 | PARBHANI | 114.328 | 94.736 | 19.592 | 73.00 |
| 22 | RATNAGIRI | 125.115 | 103.153 | 21.962 | 73.38 |
| 23 | BEED | 122.730 | 100.362 | 22.368 | 72.63 |
| 24 | AKOLA | 148.995 | 124.423 | 24.572 | 75.66 |
| 25 | LATUR | 141.063 | 116.327 | 24.736 | 74.32 |
| 26 | WARDHA | 233.445 | 206.757 | 26.688 | 83.07 |
| 27 | BULDHANA | 133.360 | 103.031 | 30.329 | 69.24 |
| 28 | THANE | 78.034 | 44.830 | 33.204 | 47.95 |
| 29 | BHANDARA | 342.046 | 308.703 | 33.343 | 86.35 |
| 30 | YAVATMAL | 339.820 | 306.033 | 33.787 | 86.14 |
| 31 | RAIGAD | 183.545 | 145.201 | 38.344 | 72.97 |
| 32 | NAGPUR | 220.556 | 179.658 | 40.898 | 76.12 |
| 33 | OSMANABAD | 165.182 | 120.948 | 44.234 | 66.96 |
| 34 | AMRAVATI | 183.991 | 123.331 | 60.660 | 61.84 |
| | TOTAL | 7825.048 | 7161.605 | 663.443 | 79.3 |

## महा आवास अभियानाच्या यशस्वीतेसाठी विभागस्तरीय अधिकाऱ्यांचे दौरे व बैठका

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ पासून महा आवास अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास) श्री.विजय मुळीक व छत्रपती संभाजी नगर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्त (विकास) डॉ.सीमा जगताप यांनी त्यांच्या विभागांतर्गत जिल्ह्यांना क्षेत्रीय भेटी देवून अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्या आढावा बैठका घेतल्या.

यामध्ये दिनांक १४ फेब्रुवारी, २०२४ रोजी श्री.विजय मुळीक यांनी सातारा, सांगली व दिनांक २० मार्च, २०२४ रोजी पुणे जिल्ह्यांचा दौरा केला. तसेच दिनांक २१ व २२ मार्च, २०२४ रोजी पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांची बैठक घेतली. यावेळी त्यांनी महा आवास अभियानातील १० उपक्रम व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या गट विकास अधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले.

त्याचप्रमाणे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२४ रोजी सहाय्यक आयुक्त(विकास) डॉ. सीमा जगताप यांनी नांदेड जिल्ह्यातील पंचायत समिती माहूर अंतर्गत ग्रामपंचायत अंजनखेड येथे विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या घरकुलांची पाहणी केली. तसेच घरकुलांची कामे सुरू न करणाऱ्या लाभार्थ्यांना गृह भेटी देवून त्यांच्या अडचणी जाणून घेवून, अडचणींचे निराकरण केले. घरकुले पूर्ण झालेल्या तसेच प्रगतीत असलेल्या लाभार्थ्यांना शासनाच्या इतर योजनांविषयी माहिती दिली.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य श्री.जोतिबा खराटे, सरपंच, विस्तार अधिकारी श्री. मुरादे, कनिष्ठ सहाय्यक केंद्रे,ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री.खुशाल पवार व ग्रामसेवक उपस्थित होते.





## अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी राज्यस्तरावरून मोहिमेचे आयोजन


प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत अपूर्ण घरकुले जलद गतीने पूर्ण करण्यासाठी दिनांक १८ मार्च, २०२४ ते दिनांक २२ मार्च, २०२४ या कालावधीत राज्यस्तरीय संपर्क अधिकारी यांच्या मार्गदर्शानाखाली व विभाग, जिल्हास्तरीय प्रोग्रामरच्या उपस्थितीत मोहिम राबविण्यात आली.

या मोहिमेकरीता राज्यस्तरावरून वर्धा येथे नागपूर व अमरावती विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून उपसंचालक श्री.नीलेश काळे व राज्य समन्वयक (MIS) श्री.मायकल एल्डन, लातूर येथे छत्रपती संभाजी नगर विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून राज्य समन्वयक (I T) श्री.राम आघाव, अहमदनगर येथे नाशिक विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून राज्य समन्वयक (M&E) डॉ.संघरत्न सोनवणे व राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई येथे पुणे व कोंकण विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून उपसंचालक श्रीमती राजलक्ष्मी येरपुडे व वास्तुविशारद श्री.परमेश्वर शेलार उपस्थित होते. यासोबतच जिल्हा प्रोग्रॅमर त्यांच्या विभागा अंतर्गत नेमून दिलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणी उपस्थित होते.

या मोहिमे अंतर्गत जी घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण आहेत, परंतु त्यांचे फोटो घेतले नाहीत, ते फोटो आवास सॉफ्ट प्रणालीवर अपलोड केलेले नाहीत व तालुकास्तरावरुन approve केलेले नाहीत, अशी घरकुले online पूर्ण करुन घेण्यात आली. Plinth व Lintel Level वरील घरकुलांना दुसरा व तिसरा हप्ता वितरीत करून घरकुल Physically पूर्ण करण्यात आली. Delayed Houses मधील घरकुले पूर्ण करण्यात आली. आधार सिडींग व आधार Authentication पूर्ण करण्यात आले.

या मोहिमेदरम्यान ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तालुकास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर व तालुकास्तरीय नोडल अधिकारी हे त्यांना नेमून दिलेल्या आपल्या कार्यक्षेत्रात उपस्थित होते. जिल्हास्तरावर या मोहिमेचे संनियंत्रण व मूल्यमापन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांचेमार्फत आढावा बैठका व क्षेत्रीय भेटींच्या माध्यमातून करण्यात आले.






## हिंगोलीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतला घरकुल योजनांचा आढावा

महा आवास अभियान २०२३-२४ अंतर्गत हिंगोली जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संजय दैने यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.नामदेव केंद्रे यांच्या उपस्थितीत दिनांक ११ जानेवारी,२०२४ रोजी पंचायत समिती कळमनुरी येथे तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांची केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजनांची लाभार्थीनिहाय आढावा बैठक घेण्यात आली.

यामध्ये सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे परिपुर्ण प्रस्ताव दिनांक १५ जानेवारी, २०२४ पर्यंत सादर करणे, पहिला हप्ता दिलेल्या लाभार्थ्यांचे तात्काळ घरकुल बांधकामे सुरू करणे, घरकुलांना बांधकामाच्या टप्प्यानुसार सर्व हप्ते विनाविलंब वितरीत करणे व महा आवास अभियान यशस्वीतेसाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न करण्याचे श्री.संजय दैने यांनी सुचित केले.

यावेळी गट विकास अधिकारी श्री. लिंबाजी बारगिरे, मनरेगा गटविकास अधिकारी श्री.प्रदिप बोंढारे, शाखा अभियंता श्री.आनंद पतंगे, विस्तार अधिकारी श्री.पाईकराव,श्री.झरकर,श्री.खैरनार,श्री.आमले,श्री.कुल कर्णी, क.सहा.शेकुराव सोनार, ऑपरेटर श्री.गंगाधर शेळके व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता उपस्थित होते.



## मा.पालकमंत्री यांच्या शुभहस्ते सांगली येथे अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरण

दिनांक २६ जानेवारी, २०२४ रोजीच्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मा.मंत्री, कामगार तथा पालकमंत्री सांगली जिल्हा यांच्या शुभहस्ते जिल्हास्तरीय अमृत महा आवास अभियान पुरस्कार २०२२-२३ वितरीत करण्यात आले. यावेळी सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून पुरस्कार विजेत्यांना गौरविण्यात आले.

याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री.राजा दयानिधी, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती तृप्ती धोडमीसे, प्रकल्प संचालक श्री.निखिल ओसवाल, पोलिस अधीक्षक श्री. बसवराज तेली, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका आयुक्त श्री.सुनील पवार, जिल्हा प्रोग्रॅमर श्री.दयानंद चव्हाण, पुरस्कारार्थी, ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मध्ये सर्वोत्कृष्ट तालुका शिराळा, खानापूर, जत आणि सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत भाळवणी, चोरोची, कौलगे व सर्वोत्कृष्ट क्लस्टर ढालगाव, लेंगरे, दरिबडची यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्याचप्रमाणे राज्य पुरस्कृत योजना मध्ये सर्वोत्कृष्ट तालुका खानापूर, वाळवा, आटपाडी आणि सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत नागोले, गव्हाण, हतनूर व सर्वोत्कृष्ट क्लस्टर ढालगाव, विसापूर, वाकुर्दे बुद्रुक यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले.



## मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली परभणी येथे महा आवास अभियान कार्यशाळा संपन्न

महा आवास अभियान २०२३-३४ या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजी करण्यात आला असून सर्व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी दिनांक ०९ जानेवारी, २०२४ रोजी परभणी येथे महा आवास अभियान २०२३-२४ अंतर्गत जिल्हास्तरीय अभियान क्षमता बांधणी कार्यशाळा मा.मंत्री, पर्यावरण, पाणी पुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी, भूकंप पुनर्वसन, संसदीय कार्य तथा पालकमंत्री, परभणी जिल्हा श्री.संजय बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली व मा. खासदार श्री.संजय जाधव, मा.खासदार श्रीमती फौजिया खान, मा. आमदार श्री.सुरेशरावजी वरपूडकर, मा. आमदार श्री.बाबाजानी दुरानी, मा.आमदार श्री.राहुल पाटील, मा.आमदार श्रीमती मेघना बोर्डीकर, मा.आमदार श्री.रत्नाकर गुट्टे, मा. आमदार श्री.विप्लव बजोरिया यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

या कार्यशाळेला जिल्हाधिकारी श्री.रघुनाथ गावडे, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विनय मून, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती रश्मी खांडेकर व जिल्ह्यातील विविध विभागाचे विभाग प्रमुख यांचे उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक श्री.विनय मून यांनी मांडले तर या कार्यशाळेचे आयोजन व सादरीकरण श्रीमती रश्मी खांडेकर यांनी केले.



## भंडारा जिल्ह्यात जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

दिनांक ८ मार्च २०२४ रोजीच्या जागतिक महिला दिनानिमित्त भंडारा जिल्ह्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या महिला लाभार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महीला घरकुल लाभार्थी सत्कार, गृहकर्ज उपलब्धता, महिला बचत गटातील महिलांचा सत्कार, महिला लाभार्थ्यांच्या हस्ते भूमिपूजन व गृहप्रवेश, इ.कार्यक्रम करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रकल्प संचालक श्री. विवेक बोंद्रेसह संबंधित सर्व अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.



## "७५ वा प्रजासत्ताक दिन परेड-२०२४" करीता नवी दिल्ली येथे घरकुल लाभार्थी आमंत्रित

"७५ वा प्रजासत्ताक दिन परेड-२०२४" या कार्यक्रमाकरीता नवी दिल्ली येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत राज्यातील १० लाभार्थी विशेष पाहुणे म्हणून भारत सरकारने आमंत्रित केले होते.

त्यानुषंगाने या कार्यक्रमाकरीता महाराष्ट्र राज्यातून दिनांक २३ जानेवारी, २०२४ रोजी १० जिल्ह्यातून १० लाभार्थ्यांसह त्यांचे कुटुंबीय, प्रत्येक जिल्ह्यातून एक जिल्हास्तरीय संपर्क अधिकारी व उपसंचालक श्री.नीलेश काळे नोडल अधिकारी म्हणून नवी दिल्ली करीता मुंबई येथून दु.४वा. रवाना झाले. त्यापुर्वी या सर्वांनी बांधकाम भवन, मुंबई येथे मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले व मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांची भेट घेतली.



## सातारा येथे प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान लाभार्थी संवाद कार्यक्रम

दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान लाभार्थी सुसंवाद कार्यक्रम मा.आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाधिकारी श्री.जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.ज्ञानेश्वर खिलारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.संतोष हराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत कलश मंगल कार्यालय, मेढा ता.जावली जि.सातारा येथे संपन्न झाला.

याप्रसंगी सातारा जिल्हयातील ९ तालुक्यातील १३५२ कातकरी लाभार्थ्यांसह प्रातांधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी, तालुका व जिल्हा स्तरीय सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी विविध कार्यक्रम तसेच घरकुल विषयी माहिती देणारे फलक व स्टॉल उभारण्यात आले होते.त्यासोबतच आरोग्य तपासणी शिबीर, घरकुल लाभार्थी नोंदणी, सांस्कृतिक कार्यक्रम, जनजागृती कार्यक्रम, विविध योजनांचा कृती संगमातून योजनांच्या लाभाविषयी माहिती व घरकुले पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांच्या यशोगाथा व मनोगत घेण्यात आले.




## पन्हाळा येथे महा आवास अभियान कार्यशाळा, पुरस्कार वितरण व लाभार्थी मेळावा

दिनांक १२ जानेवारी, २०२४ रोजी मा.आमदार डॉ.विनयरावजी कोरे यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूर जिल्ह्यातील पंचायत समिती पन्हाळा येथे महा आवास अभियान २०२३-२४ तालुकास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा संपन्न झाली. याप्रसंगी घरकुल लाभार्थी मेळावा व अमृत महा आवास अभियान २०२२-२३ तालुकास्तरीय पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी उपविभागीय अधिकारीश्री.समीर शिंगटे, तहसिलदार श्रीमती माधवी शिंदे, गट विकास अधिकारी श्रीमती सोनाली माडकर, विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर, पुरस्कारार्थी, घरकुल लाभार्थी, सरपंच, ग्रामसेवक व लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन व अभियानाविषयी सादरीकरण गट विकास अधिकारी श्रीमती सोनाली माडकर यांनी केले. तसेच याप्रसंगी पंचायत समिती मार्फत घरकुल योजनांच्या जनजागृतीसाठी स्टॉल उभारण्यात आले होते.



## मा.मंत्री, इतर मागास व बहुजन कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय बैठक संपन्न

दिनांक १८ जानेवारी, २०२४ रोजी मा.मंत्री, इतर मागास व बहुजन कल्याण श्री.अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली इतर मागास व बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीबाबत समन्वय बैठक संपन्न झाली. या बैठकीला राज्य व्यवस्थापन कक्षाच्या उपसंचालक श्रीमती राजलक्ष्मी येरपुडे यांनी सादरीकरण केले. यांच्यासमवेत राज्य समन्वयक डॉ.संघरत्न सोनवणे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व मोदी आवास योजना संदर्भात भौतिक व आर्थिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला.




## केंद्रीय कार्यकारी समिती (Empowered Committee) ची बैठक नवी दिल्ली येथे संपन्न

महाराष्ट्र राज्याचा सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता कृती आराखडा मंजुरीसाठी मा.सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.शैलेश कुमार सिंह यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५ मार्च, २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता नवी दिल्ली येथे केंद्रीय कार्यकारी समिती (Empowered Committee)ची बैठक संपन्न झाली. या बैठकीला महाराष्ट्र राज्यातून मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती मिशन श्री.रूचेश जयवंशी व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणची भौतिक प्रगती व आर्थिक प्रगती, सन २०२४-२५ व यापुर्वीचे उद्दिष्टपूर्तीचे नियोजन, उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यकता निधी आणि राज्याच्या अर्थसंकल्पातील अर्थसंकल्पीय तरतूदीची स्थिती, आवास प्लस आणि PM-JANMAN मधील भूमिहीन लाभार्थ्यांची सद्यस्थिती आणि भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन देण्याचे धोरण, मॉनिटरिंग स्थिती (सामाजिक लेखापरीक्षण, क्षेत्र अधिकारी ॲप, लोकपाल, प्रलंबित एटीआर, इ.), PM-JANMAN प्रगती आणि रोडमॅप,राज्याच्या अर्थसंकल्पात केंद्र हिस्सा आणि राज्य हिस्सा निधी तरतूद, दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत AwaasSoft मध्ये केंद्रित अभिसरण, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण अंतर्गत उद्दिष्टपूर्ती, घरांच्या डिझाईन टायपोलॉजीचा अवलंब/अंमलबजावणीची प्रगती, विशेष प्रकल्पांतर्गत घरे पूर्ण करणे, मॉडेल हाऊसेस उभारणी, माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम राबविण्याचे धोरण व आराखडा, प्रलंबित IAY घरे पूर्ण होण्याची स्थिती, इ. विषयांवर चर्चा व सादरीकरण करण्यात आले.




## मा.उप महानिदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचा महाराष्ट्र दौरा

दिनांक २८ जानेवारी, २०२४ रोजी मा.उप महा निदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.गया प्रसाद यांनी मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राज्याचा दौरा केला.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान मा.उप महा निदेशक, श्री.गया प्रसाद यांनी नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यामधील ग्रामपंचायत खंबाळे येथील केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या घरकुलांची पाहणी केली. तसेच घरकुल लाभार्थींशी चर्चा केली.

यावेळी राज्य व्यवस्थापन कक्षाचे राज्य समन्वयक(IT) श्री.राम आघाव, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती प्रतिभा संगमनेरे, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.रविंद्र परदेशी व पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी श्रीमती नाकाडे व इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कृती दल बैठक

दिनांक ३० जानेवारी, २०२४ रोजी मा.मुख्य सचिव, श्री.नितीन करीर यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व आवास योजनांतर्गत भूमिहिन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करणेसाठी कृती दलाची (Task Force)बैठक संपन्न झाली.

या बैठकीला मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. एकनाथ डवले, मा.प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग श्रीम. अ. शु. सिन्हा, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे, उपसचिव (यो-१०) श्री. सुभाष इंगळे, उपसचिव, आदिवासी विकास विभाग श्री.म.रं.शेळके, अवर सचिव, सा.का. विभाग श्री. अनिल अहिरे यांच्यासह सर्व विभागीय आयुक्त दूरदृष्य प्रणालीव्दारे उपस्थित होते.

याबैठकी मध्ये विविध घरकुल योजनांतर्गत आज पर्यंत १११८८९ भूमिहिन लाभार्थ्यांपैकी ९०३४९ भूमिहिन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात आली असून **२१५४० लाभार्थ्यांना जागेची आवश्यकता असल्याचे डॉ.राजाराम दिघे यांनी सादरीकरणात सांगितले.**

**याकरीता** बहुमजली इमारती, गृहसंकूले व अपार्टमेंट याव्दारे उर्वरीत भूमिहीन लाभार्थींना लाभ द्यावा, भुमिहीन लाभार्थ्यांची नावे वगळण्यापूर्वी विभागीय आयुक्तांनी संबंधीत लाभार्थी निहाय आढावा घेऊन योग्य तो निर्णय घावा, गावठाणालगत जर अतिक्रमण असेल तर गावठाणाची हद्द वाढ करणे व गावठाण क्षेत्रापासून दूर असलेल्या शासकीय जागेत (गायरानासह) अतिक्रमण केलेल्या धारकांना अभिन्यास (Layout) मंजूर करणेबाबत विभागीय आयुक्त यांनी कार्यवाही करावी, दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील सर्व घरे पूर्ण करावायाच्या MoRD च्या सुचना असल्याने उर्वरीत भुमिहीन लाभार्थ्यांना जागा देण्याची कार्यवाही सत्वर करावी, अशा सुचना मा.मुख्य सचिव महोदयांनी दिल्या.



## विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली विभागस्तरीय कृती दल बैठक

मा.मुख्य सचिव, श्री.नितीन करीर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० जानेवारी, २०२४ रोजी राज्यस्तरीय कृती दलाच्या झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने दिनांक १६ फेब्रुवारी, २०२४ विभागीय आयुक्त, अमरावती डॉ.निधी पाण्डेय यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय कृती दलाची (Task Force)बैठक संपन्न झाली.

या बैठकीला अमरावती विभागातील सर्व जिल्हाधिकारी,जिल्हा परिदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांचे प्रकल्प संचालक, उपायुक्त (विकास)व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये अमरावती विभागातील जिल्ह्यांमध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व आवास योजनांतर्गत भूमिहिन लाभार्थ्यांना जागा उपलब्धते बाबत उपायुक्त (विकास) यांनी सादरीकरण केले. तसेच मा.मुख्य सचिव महोदयांनी दिलेल्या सूचनांचे वाचन करण्यात आले. त्यानुषंगाने भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धतेबाबतची कार्यवाही प्राधान्याने करण्याच्या सुचना विभागीय आयुक्त, अमरावती डॉ.निधी पाण्डेय यांनी दिल्या.



## ग्रामविकास व महसूल विभागाच्या समन्वयाने २३ भूमिहीन लाभार्थ्यांची गृह स्वप्नपूर्ती

धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यांतर्गत पिंपळगाव डोळा येथे दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी ग्रामविकास व महसूल विभागाच्या समन्वयाने शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करून देऊन २३ घराची वसाहत उभारणी करीता मार्क आऊट देऊन पाया खोदकामाचे उद्घाटन धाराशिवचे जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे हस्ते करण्यात आले. यामुळे २३ भूमिहीन लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण होणार आहे.



# पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांना द्यावयाच्या अनुदानात सुधारणा

**"सर्वांसाठी घरे-२०२४"** हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. यासाठी केंद्र व राज्य शासनाने सन २०२४ पर्यंत ग्रामीण भागातील सर्व बेघर कुटूंबांना घरे उपलब्ध करुन देण्याची महत्वाकांक्षी मोहिम हाती घेतली आहे. त्या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या योजनांतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना घरकुले बांधण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. तथापि, या योजनेतील काही घरकुल पात्र लाभार्थी केवळ जागे अभावी घरकुलाचा लाभ मिळण्यापासून वंचित राहत होते. ही बाब विचारात घेऊन, ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. इंआयो-२०१५/प्र.क्र.२००/ योजना-१०, दिनांक ३० डिसेंबर, २०१५ व ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. प्रआयो-२०१७/प्र.क्र.६०/ योजना-१०, दिनांक १४ जुलै, २०१७ या शासन निर्णयान्वये राज्य शासनाने पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत घरकुलास पात्र परंतु, घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या कुटूंबांना जागा खरेदीसाठी रुपये ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते.

राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायत क्षेत्रात नागरीकरणामुळे जागा उपलब्ध होत नाही. पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत सध्या प्रति लाभार्थी रु. ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य अनुदान अनुज्ञेय आहे. ग्रामीण भागात सद्यस्थितीत जागांच्या किंमती पाहता, त्याचप्रमाणे या योजनेंतर्गत अनुज्ञेय शुल्कांचा समावेश आहे, त्यामुळे प्रत्यक्षात जागा खरेदी करण्यासाठी उपलब्ध होणारी रक्कम रु. ५०,०००/- मध्ये ५०० चौ. फुट जागा खरेदी करणे देखील शक्य होत नाही. सदरची वस्तुस्थिती विचारात घेवून पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना अर्थसहाय्य अनुदानाच्या रक्कमेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्यानुषंगाने पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या योजनांतर्गत ग्रामीण भागातील भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना घरकुल जागा खरेदीसाठी सध्याची रक्कम रु. ५०,०००/- यात वाढ करुन प्रति लाभार्थी रु. १,००,०००/- इतकी करण्यास ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०२३/ प्र.क्र.१३४/योजना-१०, दिनांकः ०६ फेब्रुवारी, २०२४ शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. प्रआयो-२०१७/प्र.क्र.६०/ योजना-१०, दिनांक १४ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील (अ) आणि (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे जागेची किंमत प्रती लाभार्थी रु. १ लाख पेक्षा जास्त असल्यास त्यावरील रक्कम लाभार्थी / लाभार्थ्यांने भरणे बंधनकारक राहील. याव्यतिरिक्त याबाबत दिनांक १४ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या इतर सर्व बाबी कायम राहतील.

ग्राम विकास विभागाच्या या हितकारी शासन निर्णयामुळे लाखो भूमिहीन लाभार्थ्यांचे घरकुलांचे स्वप्न पूर्ण होणार असून यामुळे केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत घरकुले मंजूर होवून जागे अभावी घरकुले बांधकाम अपूर्ण राहण्याचे प्रमाण नक्कीच कमी होईल. तसेच या शासन निर्णयाचा लाभ सर्व भागधारकांना होईल.





# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ५०३१ | ५०३१ | ४९५९ | ९८.५७% | १ | ३९ |
| २ | रत्नागिरी | ९६५४ | ९६५४ | ९४९० | ९८.३०% | २ | ४८ |
| ३ | रायगड | ९६७४ | ९६७४ | ९४६८ | ९७.८७% | ३ | ८१ |
| ४ | पालघर | ३५१२० | ३५१२० | ३४१९२ | ९७.३६% | ५ | ११९ |
| ५ | ठाणे | ९५०९ | ९५०९ | ९१४६ | ९६.१८% | ७ | १४३ |
| कोकण विभाग | | ६८९८८ | ६८९८८ | ६७२५५ | ९७.४९% | १ | |
| ६ | गोंदिया | ९५३०९ | ९५३०९ | ९२९७२ | ९७.५५% | ४ | २१९ |
| ७ | गडचिरोली | ३१५०० | ३१५०० | २९५०१ | ९३.६५% | ११ | २७७ |
| ८ | भंडारा | ६३४७२ | ६३४७२ | ५९३०१ | ९३.४३% | १२ | २८३ |
| ९ | वर्धा | १७५१७ | १७५१७ | १६३१८ | ९३.१६% | १३ | ७५ |
| १० | नागपूर | ३५८४९ | ३५८४९ | ३२८१९ | ९१.५५% | १६ | ३४६ |
| ११ | चंद्रपूर | ४१९२८ | ४१९२८ | ३७७५० | ९०.०४% | १८ | २१६ |
| नागपूर विभाग | | २८५५७५ | २८५५७५ | २६८६६१ | ९४.०८% | २ | |
| १२ | नाशिक | ८९२५६ | ८९२५६ | ८४२८१ | ९४.४३% | ९ | २१० |
| १३ | नंदुरबार | ११८३०२ | ११८३०२ | १११९७९ | ९३.९८% | १० | ३३२ |
| १४ | अहमदनगर | ५९४६१ | ५९४६१ | ५५२१७ | ९२.८६% | १४ | १२१ |
| १५ | धुळे | ६४५७७ | ६४५७७ | ५९०३२ | ९१.४१% | १७ | ३३४ |
| १६ | जळगाव | ७७०१८ | ७७०१८ | ६५८३८ | ८५.४८% | २५ | ४७० |
| नाशिक विभाग | | ४०८६१४ | ४०८६१४ | ३७५५४७ | ९१.९१% | ३ | |
| १७ | सातारा | १४२८९ | १४२८९ | १३८१३ | ९६.६७% | ६ | १६ |
| १८ | कोल्हापूर | १६८१५ | १६८१५ | १५०९० | ८९.७४% | १९ | ११० |
| १९ | सांगली | २०४७६ | २०४७६ | १८३६३ | ८९.६८% | २० | ४४७ |
| २० | सोलापूर | ४४५५७ | ४४५५७ | ३८९०३ | ८७.३१% | २२ | ३४० |
| २१ | पुणे | १८८२४ | १८८२४ | १६४०१ | ८७.१३% | २३ | ४२० |
| पुणे विभाग | | ११४९६१ | ११४९६१ | १०२५७० | ८९.२२% | ४ | |
| २२ | वाशिम | १८२९४ | १८२९४ | १७३०३ | ९४.५८% | ८ | ५१ |
| २३ | अकोला | ४६५४९ | ४६५४९ | ४२६८१ | ९१.६९% | १५ | ३८० |
| २४ | यवतमाळ | ६३०३९ | ६३०३९ | ५५७५६ | ८८.४५% | २१ | २१७ |
| २५ | अमरावती | ९०५८८ | ९०५८८ | ७८७५४ | ८६.९४% | २४ | ४५८ |
| २६ | बुलढाणा | ४३४९३ | ४३४९३ | ३२९८९ | ७५.८५% | ३४ | ४४९ |
| अमरावती विभाग | | २६१९६३ | २६१९६३ | २२७४८३ | ८६.८४% | ५ | |
| २७ | नांदेड | ६८३०६ | ६८३०६ | ५७३२२ | ८३.९२% | २६ | ५२२ |
| २८ | छत्रपती संभाजी नगर | ३६०७२ | ३६०७२ | ३०२१३ | ८३.७६% | २७ | ३१४ |
| २९ | जालना | २३८७७ | २३८७७ | १९९९६ | ८३.७५% | २८ | ३५० |
| ३० | हिंगोली | १७४१४ | १७४१४ | १४४९८ | ८३.२५% | २९ | ११४ |
| ३१ | बीड | ३४४४६ | ३४४४६ | २८३४० | ८२.२७% | ३० | ४१३ |
| ३२ | लातूर | १९६७० | १९६७० | १६०१० | ८१.३९% | ३१ | ४१० |
| ३३ | धाराशिव | १३७१९ | १३७१९ | १०९५७ | ७९.८७% | ३२ | ४०८ |
| ३४ | परभणी | १८७१६ | १८७१६ | १४७७२ | ७८.९३% | ३३ | २४४ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | २३२२२० | २३२२२० | १९२१०८ | ८२.७३% | ६ | |
| एकूण | | १३७२३२१ | १३७२३२१ | १२३३६२४ | ८९.८९% | | |

# रमाई आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | ६७५० | ६६५४ | ६१०४ | ९१.७३% | २ |
| २ | सिंधुदुर्ग | २१५८ | २१५८ | १९६६ | ९१.१०% | ३ |
| ३ | रायगड | २५५१ | २३०५ | १८८२ | ८१.६५% | ७ |
| ४ | पालघर | ५५७ | ५१३ | ४१६ | ८१.०९% | ८ |
| ५ | ठाणे | १५६६ | १५३९ | १०६१ | ६८.९४% | २२ |
| **कोकण विभाग** | | **१३५८२** | **१३१६९** | **११४२९** | **८६.७९%** | **१** |
| ६ | सातारा | ११२०३ | ११२०३ | १०३०६ | ९१.९९% | १ |
| ७ | सांगली | १००१४ | ९४५७ | ७४८५ | ७९.१५% | १२ |
| ८ | पुणे | १०३१७ | १०५४५ | ८०४५ | ७६.२९% | १३ |
| ९ | सोलापूर | २२४३९ | २११३५ | १५२३८ | ७२.१०% | १८ |
| १० | कोल्हापूर | १६१७३ | १५८९० | १११८२ | ७०.३७% | २० |
| **पुणे विभाग** | | **७०१४६** | **६८२३०** | **५२२५६** | **७६.५९%** | **२** |
| ११ | अहमदनगर | ३१०७४ | ३१०६९ | २६३१५ | ८४.७०% | ४ |
| १२ | नंदुरबार | ४३६४ | ३४०८ | २७५८ | ८०.९३% | ९ |
| १३ | जळगाव | २०३२४ | १९७६५ | १४३३० | ७२.५०% | १६ |
| १४ | नाशिक | २२२३३ | १३७२४ | ९९३४ | ७२.३८% | १७ |
| १५ | धुळे | १२४०१ | १०७४४ | ६८६६ | ६३.९१% | ३० |
| **नाशिक विभाग** | | **९०३९६** | **७८७१०** | **६०२०३** | **७६.४९%** | **३** |
| १६ | भंडारा | १४५९० | ११६१४ | ९५२२ | ८१.९९% | ५ |
| १७ | गडचिरोली | ७८८० | ७१७१ | ५८७१ | ८१.८७% | ६ |
| १८ | वर्धा | ८५६९ | ८५६९ | ६८२६ | ७९.६६% | १० |
| १९ | गोंदिया | १३०७८ | १२२४० | ९०३२ | ७३.७९% | १४ |
| २० | चंद्रपूर | २५१५४ | २१४८६ | १५०३६ | ६९.९८% | २१ |
| २१ | नागपूर | २००३९ | ११७३८ | ७३२० | ६२.३६% | ३३ |
| **नागपूर विभाग** | | **८९३१०** | **७२८१८** | **५३६०७** | **७३.६२%** | **४** |
| २२ | जालना | ३५७३५ | १८७८१ | १४८७० | ७९.१८% | ११ |
| २३ | परभणी | २४४२३ | १९५६५ | १४४१३ | ७३.६७% | १५ |
| २४ | बीड | ३०७३५ | २७८९४ | २००६९ | ७१.९५% | १९ |
| २५ | लातूर | ३३२८२ | ३२६६५ | २२२१२ | ६८.००% | २४ |
| २६ | धाराशिव | २१४४७ | १८७३० | १२४७२ | ६६.५९% | २५ |
| २७ | छत्रपती संभाजी नगर | २९११० | २६६११ | १७३०२ | ६५.०२% | २७ |
| २८ | नांदेड | २५९५० | २४१७३ | १५५९५ | ६४.५१% | २८ |
| २९ | हिंगोली | २०७२८ | १४८०५ | ९५१५ | ६४.२७% | २९ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **२२१४१०** | **१८३२२४** | **१२६४४८** | **६९.०१%** | **५** |
| ३० | वाशिम | १२७९१ | १२४१२ | ८५१० | ६८.५६% | २३ |
| ३१ | बुलढाणा | २४३१९ | २३०५५ | १५०२६ | ६५.१७% | २६ |
| ३२ | अमरावती | २००४९ | १९३६१ | १२३६८ | ६३.८८% | ३१ |
| ३३ | यवतमाळ | २०१०१ | १९७३१ | १२५२१ | ६३.४६% | ३२ |
| ३४ | अकोला | २८५९२ | २४२६२ | १४९६३ | ६१.६७% | ३४ |
| **अमरावती विभाग** | | **१०५८५२** | **९८८२१** | **६३३८८** | **६४.१४%** | **६** |
| **एकूण** | | **५९०६९६** | **५१४९७२** | **३६७३३१** | **७१.३३%** | |

# शबरी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | ६० | २५ | २४ | ९६.००% | २ |
| २ | सातारा | १९७ | १९७ | १८३ | ९२.८९% | ४ |
| ३ | सोलापूर | ८९४ | ६५४ | ५९६ | ९१.१३% | ५ |
| ४ | सांगली | ८० | ५० | ४३ | ८६.००% | ६ |
| ५ | पुणे | ६७३६ | ५४८२ | २९४३ | ५३.६८% | २० |
| **पुणे विभाग** | | **७९६७** | **६४०८** | **३७८९** | **५९.१३%** | **१** |
| ६ | सिंधुदुर्ग | ४३ | २९ | २९ | १००.००% | १ |
| ७ | रत्नागिरी | ३४० | २६४ | २४७ | ९३.५६% | ३ |
| ८ | ठाणे | ५४३० | ३४७७ | २१३० | ६१.२६% | १० |
| ९ | पालघर | १४३८५ | १४३३२ | ८५३० | ५९.५२% | ११ |
| १० | रायगड | ६६१० | ६४७८ | ३२६५ | ५०.४०% | २४ |
| **कोकण विभाग** | | **२६८०८** | **२४५८०** | **१४२०१** | **५७.७७%** | **२** |
| ११ | लातूर | १५३८ | ६२९ | ५१४ | ८१.७२% | ७ |
| १२ | छत्रपती संभाजी नगर | ७७८७ | ४५४६ | २८३८ | ६२.४३% | ९ |
| १३ | नांदेड | ७९९१ | १९३७ | ११२४ | ५८.०३% | १३ |
| १४ | बीड | २२३० | ११२१ | ६३४ | ५६.५६% | १८ |
| १५ | धाराशिव | ५४९ | ४५९ | २५६ | ५५.७७% | १९ |
| १६ | जालना | २९५६ | ९७५ | ५१४ | ५२.७२% | २१ |
| १७ | हिंगोली | १८०३५ | ११४७३ | ५२०८ | ४५.३९% | २६ |
| १८ | परभणी | ३८८७ | १९६५ | ८८५ | ४५.०४% | २७ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **४४९७३** | **२३१०५** | **११९७३** | **५१.८२%** | **३** |
| १९ | नंदुरबार | ४७०४६ | १६७२४ | ९९१७ | ५९.३०% | १२ |
| २० | अहमदनगर | ८६४६ | ८४२९ | ४८५४ | ५७.५९% | १४ |
| २१ | धुळे | १८५१८ | १६०४८ | ८४६० | ५२.७२% | २२ |
| २२ | जळगाव | १३३३१ | १२९४२ | ६०७१ | ४६.९१% | २५ |
| २३ | नाशिक | २७४५६ | २३९९८ | १०८०७ | ४५.०३% | २८ |
| **नाशिक विभाग** | | **११४९९७** | **७८१४१** | **४०१०९** | **५१.३३%** | **४** |
| २४ | भंडारा | ६३३६ | ६२४८ | ४०२९ | ६४.४८% | ८ |
| २५ | वर्धा | ५६९२ | ५६९२ | ३२७५ | ५७.५४% | १५ |
| २६ | गडचिरोली | १०९५१ | १००६५ | ५७४७ | ५७.१०% | १६ |
| २७ | गोंदिया | ५५९९ | ५५८५ | ३१८४ | ५७.०१% | १७ |
| २८ | चंद्रपूर | २३१८२ | १६४०९ | ६८६२ | ४१.८२% | ३० |
| २९ | नागपूर | १३१८८ | ११५४७ | ३३८९ | २९.३५% | ३४ |
| **नागपूर विभाग** | | **६४९४८** | **५५५४६** | **२६४८६** | **४७.६८%** | **५** |
| ३० | वाशिम | २९७० | २४६६ | १२८८ | ५२.२३% | २३ |
| ३१ | यवतमाळ | १४३२२ | १४२९८ | ६२१० | ४३.४३% | २९ |
| ३२ | अकोला | ५८१५ | ४५३७ | १८७६ | ४१.३५% | ३१ |
| ३३ | बुलढाणा | ४१९१ | २७२० | १०९० | ४०.०७% | ३२ |
| ३४ | अमरावती | १५२३५ | १४७२२ | ४६१३ | ३१.३३% | ३३ |
| **अमरावती विभाग** | | **४२५३३** | **३८७४३** | **१५०७७** | **३८.९२%** | **६** |
| **एकूण** | | **३०२२२६** | **२२६५२३** | **१११६३५** | **४९.२८%** | |

# पारधी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | ४३२ | ४३२ | ४२१ | ९७.४५% | ९ |
| २ | अहमदनगर | १९८ | १९८ | १८३ | ९२.४२% | १४ |
| ३ | जळगाव | ५७० | ५६९ | ५१९ | ९१.२१% | १५ |
| ४ | नाशिक | १४३ | १३७ | ११३ | ८२.४८% | २३ |
| ५ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.००% | २९ |
| **नाशिक विभाग** | | **१३५३** | **१३३६** | **१२३६** | **९२.५१%** | **१** |
| ६ | वाशिम | ६४ | ६४ | ६३ | ९८.४४% | ७ |
| ७ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३५४ | ९५.४२% | ११ |
| ८ | अकोला | ३७४ | ३७३ | ३५२ | ९४.३७% | १२ |
| ९ | अमरावती | ४५१ | ४४४ | ४१६ | ९३.६९% | १३ |
| १० | यवतमाळ | ५९४ | ५९४ | ४९१ | ८२.६६% | २२ |
| **अमरावती विभाग** | | **१८५४** | **१८४६** | **१६७६** | **९०.७९%** | **२** |
| ११ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००% | १ |
| १२ | लातूर | १७ | १३ | १३ | १००% | ३ |
| १३ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००% | ४ |
| १४ | परभणी | ५६ | ५६ | ५६ | १००% | ५ |
| १५ | बीड | ९२ | ८६ | ७८ | ९०.७०% | १६ |
| १६ | छत्रपती संभाजी नगर | ५७ | ५१ | ४६ | ९०.२०% | १७ |
| १७ | जालना | ३८ | ३६ | ३२ | ८८.८९% | १८ |
| १८ | धाराशिव | २४७ | २४७ | २०९ | ८४.६२% | २१ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **५९२** | **५६६** | **५११** | **९०.२८%** | **३** |
| १९ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००% | २ |
| २० | सातारा | २४ | २४ | २४ | १००% | ६ |
| २१ | सोलापूर | २३१ | २०२ | १९५ | ९६.५३% | १० |
| २२ | सांगली | ३८ | २६ | २३ | ८८.४६% | १९ |
| २३ | पुणे | १८८ | १७४ | १३४ | ७७.०१% | २४ |
| **पुणे विभाग** | | **४८८** | **४३३** | **३८३** | **८८.४५%** | **४** |
| २४ | वर्धा | ५० | ५० | ४९ | ९८.००% | ८ |
| २५ | नागपूर | ४८ | ४८ | ४२ | ८७.५०% | २० |
| २६ | चंद्रपूर | ३५ | ३३ | २२ | ६६.६७% | २५ |
| **नागपूर विभाग** | | **१३३** | **१३१** | **११३** | **८६.२६%** | **५** |
| २७ | रायगड | २ | ० | ० | ०.००% | ३१ |
| २८ | रत्नागिरी | १ | ० | ० | ०.००% | ३२ |
| **कोकण विभाग** | | **३** | **०** | **०** | **०.००%** | **६** |
| **एकूण** | | **४४२३** | **४३१२** | **३९१९** | **९०.८९%** | |

# आदिम आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ६६ | ५० | ५० | १००% | १ |
| २ | पालघर | ११३३१ | ११२२८ | १०८८६ | ९६.२८% | २ |
| ३ | रायगड | १३९४ | १३९४ | १३०७ | ९३.७६% | ३ |
| ४ | ठाणे | १५७८ | १५७१ | १४७१ | ९३.६३% | ४ |
| ५ | रत्नागिरी | ११ | ११ | ८ | ७२.७३% | ७ |
| **कोकण विभाग** | | **४१८०** | **४१५४** | **३९२२** | **९४.४२%** | **१** |
| ६ | नांदेड | ४१९ | १८१ | १४२ | ७८.४५% | ६ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **४१९** | **१८१** | **१४२** | **७८.४५%** | **२** |
| ७ | गडचिरोली | १७७८ | १७५२ | १५२८ | ८७.२१% | ५ |
| ८ | चंद्रपूर | ७२३ | ६७० | ४५९ | ६८.५१% | ८ |
| ९ | वर्धा | ३९६ | ३९६ | १७३ | ४३.६९% | ११ |
| **नागपूर विभाग** | | **२८९७** | **२८१८** | **२१६०** | **७६.६५%** | **३** |
| १० | यवतमाळ | ४७८४ | ४६६८ | २७८९ | ५९.७५% | ९ |
| **अमरावती विभाग** | | **४७८४** | **४६६८** | **२७८९** | **५९.७५%** | **४** |
| ११ | पुणे | ७५ | ७१ | ३३ | ४६.४८% | १० |
| **पुणे विभाग** | | **७५** | **७१** | **३३** | **४६.४८%** | **५** |
| १२ | नाशिक | ९८ | ३७ | १२ | ३२.४३% | १२ |
| **नाशिक विभाग** | | **९८** | **३७** | **१२** | **३२.४३%** | **६** |
| **एकूण** | | **१२४५३** | **११९२९** | **९०५८** | **७५.९३%** | |

# प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२४

| अ.क्र. | जिल्हा | कच्चे घरकुले असलेल्या आदिम जमातींची सुधारीत कुटुंब संख्या | एकुण कुटुंब सर्वेक्षण | एकुण पात्र | एकुण नोंदणी | मंजुरी | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | २१७ | २४८ | २४८ | १९४ | १७० | ५७ | ३३.५% | १ |
| **छत्रपती संभाजी नगर** | | **२१७** | **२४८** | **२४८** | **१९४** | **१७०** | **५७** | **३३.५%** | **१** |
| २ | रायगड | १४८०१ | १५९८६ | ११६९१ | ८०१८ | २१३१ | १५५ | ७.३% | २ |
| ३ | पालघर | ६६४१ | ५०६७ | ४६०४ | ३८०३ | १२५४ | १५ | १.२% | ४ |
| ४ | रत्नागिरी | ६०० | ९७१ | ५३७ | ४६४ | २२० | १ | ०.५% | ८ |
| ५ | ठाणे | ६९०५ | ३१८९ | २८१० | १६७८ | ५०५ | १ | ०.२% | ९ |
| ६ | सिंधुदुर्ग | ३०८ | १७१ | ६७ | ४९ | ५ | ० | ०.००% | १६ |
| **कोकण विभाग** | | **२९२५५** | **२५३८४** | **१९७०९** | **१४०१२** | **४११५** | **१७२** | **४.१८%** | **२** |
| ७ | यवतमाळ | ९८४६ | ५००५ | ४७०८ | २८४१ | १३०७ | ३१ | २.३७% | ३ |
| ८ | अमरावती | २१ | २७ | २७ | २१ | २१ | ० | ०.००% | ११ |
| **अमरावती विभाग** | | **९८६७** | **५०३२** | **४७३५** | **२८६२** | **१३२८** | **३१** | **२.३३%** | **३** |
| ९ | नाशिक | २६०६ | २७४६ | २२६३ | १७२८ | ८२३ | ६ | ०.७३% | ६ |
| १० | अहमदनगर | ५५ | ७१ | ६३ | ६२ | ३५ | ० | ०.००% | १० |
| **नाशिक विभाग** | | **२६६१** | **२८१७** | **२३२६** | **१७९०** | **८५८** | **६** | **०.७०%** | **४** |
| ११ | वर्धा | ६७२ | ६८७ | ५९६ | ४४३ | १७८ | २ | १.१२% | ५ |
| १२ | गडचिरोली | १२५३५ | ७७५४ | ६९६८ | ४४६४ | ७५२ | ४ | ०.५३% | ७ |
| १३ | चंद्रपूर | ५९३ | ६७४ | ३६९ | ३२७ | १९५ | ० | ०.००% | १२ |
| **नागपूर विभाग** | | **१३८००** | **९११५** | **७९३३** | **५२३४** | **११२५** | **६** | **०.५३%** | **५** |
| १४ | कोल्हापूर | ४१ | २६ | २२ | २२ | ० | ० | ०.००% | १३ |
| १५ | पुणे | ३१३५ | २५६२ | २१७४ | ३४३ | ७२ | ० | ०.००% | १४ |
| १६ | सातारा | २१६ | ८४७ | ७११ | ६७५ | १९ | ० | ०.००% | १५ |
| **पुणे विभाग** | | **३३९२** | **३४३५** | **२९०७** | **१०४०** | **९१** | **०** | **०.००%** | **६** |
| **एकूण** | | **५९१९२** | **४६०३१** | **३७८५८** | **२५१३२** | **७६८७** | **२७२** | **३.५४%** | |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भंडारा | २२ | २१ | ८ | ३८.१०% | १ |
| २ | गोंदिया | १५ | १४ | १ | ७.१४% | ८ |
| ३ | वर्धा | ५४८ | ० | ० | ०.००% | १५ |
| | नागपूर विभाग | ५८५ | ३५ | ९ | २५.७१% | १ |
| ४ | वाशिम | ४१ | ४१ | १० | २४.३९% | २ |
| ५ | बुलढाणा | ८६ | ८० | १७ | २१.२५% | ४ |
| | अमरावती विभाग | १२७ | १२१ | २७ | २२.३१% | २ |
| ६ | कोल्हापूर | ५२५ | ५२५ | ६४ | १२.१९% | ७ |
| ७ | सातारा | २७३ | ० | ० | ०.००% | १४ |
| | पुणे विभाग | ७९८ | ५२५ | ६४ | १२.१९% | ३ |
| ८ | जळगाव | १९२ | १६९ | २९ | १७.१६% | ५ |
| ९ | अहमदनगर | १५८ | १५३ | ० | ०.००% | १० |
| १० | नंदुरबार | २ | ० | ० | ०.००% | १२ |
| | नाशिक विभाग | ३५२ | ३२२ | २९ | ९.०१% | ४ |
| ११ | जालना | १०५ | १०४ | २४ | २३.०८% | ३ |
| १२ | परभणी | ४४०३ | २२९ | ३२ | १३.९७% | ६ |
| १३ | लातूर | ८३३ | ५३४ | १ | ०.१९% | ९ |
| १४ | नांदेड | ५ | ० | ० | ०.००% | ११ |
| | छत्रपती संभाजी नगर विभाग | ५३४६ | ८६७ | ५७ | ६.५७% | ५ |
| १५ | रायगड | १२ | १२ | ० | ०.००% | १३ |
| | कोकण विभाग | १२ | १२ | ० | ०.००% | ६ |
| | एकूण | ७२२० | १८८२ | १८६ | ९.८८% | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | १५० | ११८ | ७१ | ६०.१७% | ४ |
| | कोकण विभाग | १५० | ११८ | ७१ | ६०.१७% | १ |
| २ | कोल्हापूर | ६५ | ६५ | ४९ | ७५.३८% | २ |
| ३ | सातारा | १९५ | १९३ | ९६ | ४९.७४% | ५ |
| ४ | सोलापूर | १४ | १४ | ३ | २१.४३% | ७ |
| ५ | पुणे | २० | ० | ० | ०.००% | २८ |
| ६ | सांगली | १०६१ | ० | ० | ०.००% | ३० |
| | पुणे विभाग | १३५५ | २७२ | १४८ | ५४.४१% | २ |
| ७ | धाराशिव | ४९९० | ५८२ | २७२ | ४६.७४% | ६ |
| ८ | परभणी | ४४४ | ४२८ | ७३ | १७.०६% | ८ |
| ९ | लातूर | ७७ | ७२ | १० | १३.८९% | १० |
| १० | जालना | २२२३ | १९९८ | २३२ | ११.६१% | १३ |
| | छत्रपती संभाजी नगर विभाग | ७७३४ | ३०८० | ५८७ | १९.०६% | ३ |
| ११ | अमरावती | ५०७ | ३९३ | ३१४ | ७९.९०% | १ |
| १२ | यवतमाळ | ४४९४ | ३७३७ | ३६५ | ९.७७% | १४ |
| | अमरावती विभाग | ५००१ | ४१३० | ६७९ | १६.४४% | ४ |
| १३ | नागपूर | ५४० | १२ | ९ | ७५.००% | ३ |
| १४ | भंडारा | २८०३ | २६१४ | ३३९ | १२.९७% | ११ |
| १५ | चंद्रपूर | ७२६० | ५११७ | ६०९ | ११.९०% | १२ |
| १६ | गोंदिया | ११६४ | ११४० | २१ | १.८४% | १५ |
| | नागपूर विभाग | ११७६७ | ८८८३ | ९७८ | ११.०१% | 5 |
| १७ | धुळे | १५२ | १३६ | १९ | १३.९७% | ९ |
| १८ | जळगाव | १०४९ | ८२७ | ३ | ०.३६% | १६ |
| १९ | अहमदनगर | २० | २० | ० | ०.००% | १७ |
| २० | नंदुरबार | ३५ | ० | ० | ०.००% | २५ |
| | नाशिक विभाग | १२५६ | ९८३ | २२ | २.२४% | ६ |
| | एकूण | २७२६३ | १७४६६ | २४८५ | १४.२३% | |

# मोदी आवास घरकुल योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | २३५९८ | २३५९८ | २६९ | १.१४% | १ |
| २ | परभणी | १३५९६ | १३५८७ | ९७ | ०.७१% | ३ |
| ३ | जालना | ८४९६ | ८३५४ | ८ | ०.१०% | १३ |
| ४ | छत्रपती संभाजी नगर | ५८१२ | ५४६० | ५ | ०.०९% | १४ |
| ५ | धाराशिव | २२७४ | २२७४ | २ | ०.०९% | १५ |
| ६ | लातूर | ६३१८ | ६३१८ | २ | ०.०३% | २० |
| ७ | हिंगोली | ३३५४ | ३३५४ | १ | ०.०३% | २१ |
| ८ | बीड | १६०४१ | १६०४१ | १ | ०.०१% | २७ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **७९४८९** | **७८९८६** | **३८५** | **०.४९%** | **१** |
| ९ | सातारा | १७७७ | १७७७ | १४ | ०.७९% | २ |
| १० | सांगली | १९५८ | १९५८ | ९ | ०.४६% | ४ |
| ११ | सोलापूर | ११०१९ | ११०१८ | ३१ | ०.२८% | ७ |
| १२ | पुणे | १५२१ | १५२१ | १ | ०.०७% | १७ |
| १३ | कोल्हापूर | २०३१ | २०१४ | ० | ०.००% | २९ |
| **पुणे विभाग** | | **१८३०६** | **१८२८८** | **५५** | **०.३०%** | **२** |
| १४ | वाशिम | १२४५५ | १२४५५ | ५६ | ०.४५% | ५ |
| १५ | अकोला | ७३५३ | ७३५३ | १३ | ०.१८% | ११ |
| १६ | बुलढाणा | १७०५५ | १७०५५ | ९ | ०.०५% | १९ |
| १७ | यवतमाळ | २९९९९ | २९९९९ | ८ | ०.०३% | २४ |
| १८ | अमरावती | १४१७८ | १४१७८ | ३ | ०.०२% | २५ |
| **अमरावती विभाग** | | **८१०४०** | **८१०४०** | **८९** | **०.११%** | **३** |
| १९ | रत्नागिरी | ६३५६ | ६३५६ | १२ | ०.१९% | ९ |
| २० | रायगड | २४५६ | २४५६ | २ | ०.०८% | १६ |
| २१ | पालघर | ४५८ | ४५८ | ० | ०.००% | ३२ |
| २२ | सिंधुदुर्ग | १३०८ | १३०८ | ० | ०.००% | ३३ |
| २३ | ठाणे | २५३८ | २५३८ | ० | ०.००% | ३४ |
| **कोकण विभाग** | | **१३११६** | **१३११६** | **१४** | **०.११%** | **४** |
| २४ | गडचिरोली | ६५४८ | ६५४८ | २२ | ०.३४% | ६ |
| २५ | वर्धा | ४९६५ | ४९६५ | ९ | ०.१८% | १० |
| २६ | नागपूर | ६७४७ | ६७४७ | ८ | ०.१२% | १२ |
| २७ | चंद्रपूर | १०८७४ | १०८७४ | ३ | ०.०३% | २२ |
| २८ | भंडारा | ११०३३ | ११०३३ | ३ | ०.०३% | २३ |
| २९ | गोंदिया | १४४२९ | १४४२९ | ३ | ०.०२% | २६ |
| **नागपूर विभाग** | | **५४५९६** | **५४५९६** | **४८** | **०.०९%** | **५** |
| ३० | अहमदनगर | ४३५६ | ४३३६ | १० | ०.२३% | ८ |
| ३१ | जळगाव | २९५३१ | २९५१५ | १७ | ०.०६% | १८ |
| ३२ | धुळे | ९७०९ | ९७०९ | ० | ०.००% | २८ |
| ३३ | नंदुरबार | २८७६ | २८७६ | ० | ०.००% | ३० |
| ३४ | नाशिक | ६९८१ | ६९८१ | ० | ०.००% | ३१ |
| **नाशिक विभाग** | | **५३४५३** | **५३४१७** | **२७** | **०.०५%** | **६** |
| **एकूण** | | **३०००००** | **२९९४४३** | **६१८** | **०.२१%** | |

# रमाई आवास योजनेमुळे पक्क्या घरकुलाची स्वप्नपूर्ती

**“सर्वांसाठी घरे-२०२४”** हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना तसेच त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमण नियमानुकूल करणे अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत.

जिल्हास्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येते. या योजनांच्या लाध्यमातून लाखो गरीब, गरजू, बेघर व भूमिहीन लाभार्थ्यांचे स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाले असून मजरा(रै) गावातील लाभार्थ्यांना महा आवास अभियानात मिळालेला घरकुलांचा लाभ हे त्याचं उत्कृष्ट उदाहण आहे.

चंद्रपुर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यांतर्गत मजरा (रै.) ग्रामपंचायत असून तालुक्याच्या मुख्यालया पासून ४ कि.मी. अंतरावर आहे. या गावामध्ये अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असलेल्या ४६ पात्र लाभार्थ्यांना रमाई आवास योजने अंतर्गत ४६ घरकुले मंजुर झाली. त्यापैकी १६ मंजुर लाभार्थ्यांची जागेची व पैशाची अडचण निर्माण झाल्याने त्यांच्या गृह स्वप्नपूर्तीसाठी गृहसंकुल बांधण्याचा निर्णय वरोरा पंचायत समितीने घेतला.

रमाई आवास योजनेतील या सर्व १६ पात्र लाभार्थ्याची परिस्थिती अत्यंत हालाखीची असून हे लाभार्थी कच्च्या कुडा मातीच्या घरात राहत होते. पावसाळ्यात पावसाचे पाणी छतातून गळत तर होतचं, पण त्यासोबतच रस्त्यावरील पाणी घरातही शिरत होते. घराच्या भिंती कमकुवत झाल्याने त्यामध्ये भेगा पडल्या होत्या आणि या भेगांमध्ये साप, विंचू व इतर विषारी किटक दडून बसायचे. त्यामुळे कित्येकदा या विषारी जीवजंतूपासून धोका असायचा. अशा अनेक प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावे लागत असल्याने अशरशः जीव मुठीत घेवून जीवन जगत होतो. या सर्व अडचणी काय कमी होत्या, त्यामध्ये घरांना विद्युत पुरवठा नव्हता व शौचालयाची व्यवस्थाही नव्हती. त्यामुळे कित्येकदा अंधारामुळे लहान मोठ्यांना अपघाताला सामोरे जावे लागत होते. आर्थिक परिस्थिती दुर्बल असल्यामुळे अशा जीवघेण्या परिस्थीत जीवनमान व्यतित करण्याशिवाय या लाभार्थ्यांकडे पर्याय नव्हता. कुटुंबांतील सदस्यांची पक्के घर बांधकामासाठी सतत मागणी असायची, परंतु घर बांधायला पुरेसा पैसा नव्हता.

या विषयी त्यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांचेशी चर्चा केली. त्यानुसार या सर्व लाभार्थ्यांचा घरकुल मागणीचा प्रस्ताव तयार करून मंजूरीसाठी पाठविण्यात आला. त्यानुसार रमाई आवास योजने अंतर्गत या सर्व लाभार्थ्यांना घरकुले मंजुर झालीत. त्यामध्ये त्यांना 1 रूम, स्वयंपाक घर व शौचालयांचे बांधकाम करण्याकरिता प्रत्येकी रक्कम रु. १,३२,०००/- अनुदान बांधकामाच्या टप्प्यानुसार मिळाले. या अनुदानाचा पुरेपूर वापर करून त्यांनी पक्के घरकुलाचे बांधकाम केले. घरकुलासोबतच महात्मा गांधी रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत मिशन, प्रधानमंत्री उज्वला योजना, सौभाग्य योजना, जल जीवन मिशन व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती मिशन इ. योजनांच्या कृती संगमातून लाभ दिल्याने लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावले.

त्यांना मिळालेल्या पक्क्या घरकुलामुळे त्यांना नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागत नाही. तसेच शौचालयास उघड्यावर जावे लागत नाही व घराला विद्युत पुरवठा जोडला मिळाल्याने सांप, विंचू, व इतर हिंसक प्राण्यापासून धोका नाही. ग्रामपंचायत मजरा(रै.) येथील लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळाल्याने त्यांचे जीवन अत्यंत आनंदी झाले आहे.





# वाशिम जिल्ह्यातील लोणी बु. गावात उभारली सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत

लोणी बु. ग्रामपंचायत रिसोड तालुक्यातील वाशिम जिल्ह्यामध्ये आहे. ग्रामपंचायत लोणी बु या गावात प्रसिद्ध देवस्थान श्री.सखाराम महाराज यांची समाधी आहे. यानिमित्त दरवर्षी यात्रा भरते यात्रेमध्ये. या काळात लोणी बु येथे विविध खेळ व खाद्यपदार्थांची दुकाने थाटतात.मनोरंजनासाठी तमाशा नाटक इत्यादी आयोजित केली जातात. या ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्या ३,३८१, एकूण कुटूंब संख्या ७३२ व विविध आवास योजने अंतर्गत एकूण घरकूले पूर्ण लाभार्थी संख्या ७७ इतकी आहे.

"महा आवास अभियान २०२१-२२" मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत **ग्रामपंचायत लोणी बु., तालुका रिसोड, जिल्हा वाशिम यांची 'महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत म्हणून द्वितीय क्रमांकाच्या पुरस्कारासाठी** राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती मार्फत निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी महाराष्ट्र राज्याचे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

लोणी बु. ग्रामस्तरीय महा आवास अभियान कार्यशाळा मा.पंचायत समिती सदस्या श्रीमती चंद्रभागा निवृत्ती नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व ग्रामस्थ, लाभार्थी, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, तलाठी, तालुकास्तरीय अधिकारी/कर्मचारी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन व सादरीकरण ग्रामसेवक व तलाठी यांनी केले.

" महा आवास अभियान २०२१-२२" अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत बहुमजली इमारत उभारणे या उपक्रमात ग्रामपंचायतीने सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांच्या या यशस्वी कामगिरीसाठी ग्रामपंचायतीचे सरपंच श्रीमती प्रिया राजाराम चौगुले, उपसरपंच श्रीमती पूजा संदीप पारवे, ग्रामसेवक श्री. प्रल्हाद घुगे व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. अनिल रामभाऊ आडे यांनी परिश्रम घेतले. त्यांच्या या यशात ग्रामपंचायतस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीच्या सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

श्री. गजानन दामोदर गांजरे यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. त्यांना राहण्याकरिता जागा नसल्याने त्यांच्या परिवाराची राहण्याची अडचणी निर्माण झाली होती. त्यांना घरकुल मंजूर झाले होते, परंतु घरकुल बांधायला त्यांच्याकडे पुरेशी जागा नव्हती. त्यामुळे ग्रामसेवक व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी त्यांना बहुमजली इमारत बांधण्याचा पर्याय सुचविला आहे.

"महा आवास अभियान २०२१-२२" अंतर्गत श्री.गजानन दामोदर गांजरे या घरकुल लाभार्थ्याला जागा उपलब्ध करून देण्याकरिता G+1 बाबत मार्गदर्शन देण्यात आले तसेच लाभार्थ्याला बांधकाम साहित्य उपलब्ध होण्यासाठी बचत गट मार्फत सिमेंट विटा व इतर साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. अशा प्रकारे श्री. गजानन दामोदर गांजरे यांनी बहुमजली इमारत बांधल्याने त्यांच्या कुटुंबाला निवारा मिळाला. या सोबतच इतर शासकीय योजनांशी कृतीसंगम करून लाभर्थ्यांना लाभ देण्यात आला. त्यांना घरकुलासह महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रू.१८,०००/- लाभ मिळाला असून त्यामुळे त्यांना घरकुल बांधकामात आर्थिक मदत झाली. याकामी त्यांना सहकार्य करणारे सरपंच, उपसरपंच, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक व इतर शासकीय यंत्रणा यांचे शतशः ऋणी असल्याचे मत श्री. गजानन दामोदर गांजरे व्यक्त केले.





# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मुळे मिळाला हक्काचा निवारा

**खे**ड हे गाव महाराष्ट्र राज्यातील धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव तालुक्यात असून मराठवाड्यातील छत्रपती संभाजी नगर विभागातील आहे. हे गाव धाराशिव जिल्हा मुख्यालयापासून १५ किमी अंतरावर असून स्थानिक भाषा मराठी आहे. खेड गावाची एकूण लोकसंख्या ३,४६५ असून घरांची संख्या ७१४ इतकी आहे.

खेड या गावामध्ये श्री.रघुनाथ साधू गवळी या दिव्यांग व्यक्तीने स्वबळावर व अत्यंत कष्ट घेवून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले असून आपल्या परिवाराचे पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण केले. त्यामुळे त्यांचा परिवार कोणतीही भिती न बाळगता स्वतःच्या पक्क्या घरात आनंदाने वास्तव्य करतो आहे. त्यांच्या या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

श्री. रघुनाथ साधू गवळी मौजे खेड तालुका जिल्हा धाराशिव येथील रहिवासी असुन ते दुसऱ्यांच्या शेतात मजूर म्हणून काम करत होते. एक दिवस शेतीचे काम करत असताना त्यांच्यावर फार मोठे संकट ओढावले, शेतातील एका मशीनमध्ये हात गेला आणि या अपघातात त्यांचा एक हात कायमचा निकामी होवून त्यांना अपंगत्व आले. शेत मजूरी करून ते त्यांच्या परिवाराचा उदरनिर्वाह काटकसरीने करत होते. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. त्यामध्ये त्यांच्या परिवारात पत्नी व तीन मुली असल्याने या ४ कुटुंबातील सदस्यांची मोठी जबाबदारी त्यांच्यावर होती. त्यांच्या हात गमावल्यावर त्यांची पत्नी मोठ्या हिंमतीने त्यांच्या पाठीशी उभी राहीली आणि संसाराचा गाडा दोघे मिळून ओढायला सुरूवात केली. अचानक आलेल्या या अपंगत्वाच्या संकटामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षाही बिकट झाली.

या सर्व संकटात भर घालण्यासाठी त्यांचे मोडकडीस आलेले घर ही एक सर्वात मोठी समस्या होती. श्री.रघुनाथ साधू गवळी यांचे घर जीर्ण होवून पडायला आल्याने पावसाळा त्यांना व त्यांच्या कुटुंबाला नकोसा झाला होता. पण निसर्ग त्याचे चक्र कसे थांबवणार, तो तर त्याचे काम करणारचं हे त्यांना चांगलेच ज्ञात होते. पावसाळ्यात त्यांच्या घराचे पत्र्याचे छत सर्व बाजूने गळायचे, मातीच्या भिंती असल्याने व कित्येक कालावधीपासून त्यांची देखभाल दुरूस्ती न केल्यामुळे भिंती फुगून कधी पडतील याचा काही भरवसा नव्हता. पक्के घर म्हणजे त्यांच्यासाठी कधीही पूर्ण न होणारे स्वप्न झाले होते. अशा या कठीण परिस्थितीमुळे ते व त्यांचे कुटुंबीय नैराश्यात गेले होते. त्यांच्या या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी त्यांना वाट सापडणे कठीण झाले होते.

अशातच खेड गावामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल लाभार्थी निवड सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये श्री.रघुनाथ साधू गवळी यांचे नाव पात्र यादीमध्ये आल्याने त्यांना सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजूर झाले. त्यासोबतच त्याच वर्षी त्यांना घरकुलाचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळे त्यांच्या दुःखी जीवनात एक आशेची किरण घरकुल योजनेच्या माध्यमातून आनंद घेऊन आली.

घरकुल मंजुर झाल्यावर पंचायत समिती व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धाराशिव यांनी वेळोवेळी सहकार्य व घरकुल बांधकामासंबंधित आवश्यक मार्गदर्शन केले. त्यासोबतच घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार सर्व हप्ते विनाविलंब श्री.रघुनाथ साधू गवळी यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आले. त्यांना घरकुल बांधकामासाठी रक्कम रू. १,२०,०००/- इतके अनुदान प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत मिळाले. तसेच महात्मा गांधी रोजगार हमी योजने मधून रू.१८,०००/- मजूरी, स्वच्छ भारत मिशन मधून शौचालयासाठी रू.१२,०००/- असे एकुण रू.१,५०,०००/- श्री.रघुनाथ साधू गवळी यांना मिळाले. यासोबतच वीज जोडणी, गॅस जोडणी, नळ जोडणी व उपजीविकेचे साधनही मिळाले.

कमी खर्चात पक्के घरकुल बांधण्यासाठी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी White Pre-Cast सिमेंट कॉंक्रीट शीटचा पर्याय दिल्याने श्री.रघुनाथ साधू गवळी यांनी कमी कालावधीत चांगल्या घरकुलाची निर्मिती केली.

आता स्वतःच्या हक्काचे घरकुलाचे बांधकाम झाल्याने मला व माझ्या संपुर्ण कुटुंबाला नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावे लागत नाही. तसेच शासनाकडुन घरकुलामुळे माझे जीवनमान उंचावले असून मजुरीला जाण्यासाठी व मुलांना शैक्षणिक दृष्या सोई सुविधा प्राप्त करुन घेण्यासाठी माझ्यात नवचेतना आली आहे. मी ग्राम पंचायत खेड व शासनाचे मन:पुर्वक आभारी मानत असल्याचे मत श्री.रघुनाथ साधू गवळी यांनी व्यक्त केले.



# गृहसंकुल उभारणीमुळे मिळाला बेघरांना हक्काचा पक्का निवारा

नांदगाव तालुका व जिल्हा अहमदनगर हे गाव अहमदनगर पासून २५ कि.मी. अंतरावर असून या गावची सन २०११ च्या जनगणने नुसार एकूण लोकसंख्या ३,२३७ आहे. मुख्यालयाच्या शेजारी असलेल्या यागावात विविध समाजाची २५० कुटुंबे अंदाजे ६५० लोक झोपड्यात, पत्राचे शेड व दगड मातीच्या कच्च्या घरात राहत होते. राहत असलेल्या ठिकाणी कोणत्याही मुलभूत नागरी सुविधा नसल्याने या लोकांना पावसाळ्यात प्रचंड हाल अपेष्ठा सहन कराव्या लागत होत्या. पावसाळ्यात या लोकांना गावातील मंदिर, चावडी, शाळा व समाज मंदिरात आश्रय घेण्या शिवाय पर्याय नव्हता. ही सर्व लोक शेतमजुरी, बांधकाम मजुरी, ऊसतोड, व औद्योगिक वसाहत येथे मजुरीची कामे करून त्यांचा उदरनिर्वाह चालवत होती.

इतरांप्रमाणे आपलेही स्वतःचे पक्के घरकुल असावे यासाठी या सर्वांनी ग्रामपंचायती कडे घरकुलाची मागणी केली. विविध समाजातील लाभार्थ्यांनी केलेली घरकुलांची मागणी पूर्ण करण्यासाठी त्यांच्या वस्तीमध्ये जाऊन ग्रामपंचायतीच्या पदाधिकारी व कर्मचारी यांनी बैठक घेतली. त्यांना केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनेबाबत सविस्तर माहिती दिली. या समाजातील काही लाभार्थी कामधंद्यासाठी, ऊसतोडीसाठी व वीटभट्टी कामासाठी स्थलांतरीत झाले होते. या सर्व लाभार्थ्यांना एकत्र करून योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती दिली. तसेच त्यांच्या कागदपत्र पुर्ततेसाठी कागदपत्र मेळावा घेवून कागदपत्रांची पुर्तता करून त्यांचा घरकुल मागणी प्रस्ताव तयार करण्यात आला.

परंतु या लाभार्थ्यांकडे स्वतः ची जागा नसल्यामुळे पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेमधून अर्थसहाय्य मिळणेबाबचा प्रस्ताव नांदगाव ग्रामपंचायतीने पंचायत समिती अहमदनगरचे गटविकास अधिकारी यांना दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी सादर केला. त्यानुसार पंडित दीनदयाळ घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून २९ लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी रू.४४,०८०/- प्रमाणे एकुण रक्कम रू.१२,७८,३२०/- व १० लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी रू.४४,१३०/- प्रमाणे एकुण रक्कम रू.४,४१,३००/- लाभ देण्यात आला.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ४० लाभार्थ्यांना रक्कम रू.१,२०,०००/- प्रमाणे अनुदान देण्यात आले.तसेच विविध शासकीय योजनांच्या कृती संगमातून या लाभार्थ्यांना स्वच्छ भारत मिशन मधून प्रत्येकी रू.१२,०००/- शौचालयासाठी प्रोत्साहनपर अनुदान, ४० कुटुंबातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरण व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ४ महिला स्वयंसहायता बचत गटांची स्थापना, १५ वा वित्त आयोगा मधून अंतर्गत रस्ते, पेव्हिंगब्लॉक्स बसविण्यात आले. आयडीबीआय बँक, अहमदनगर यांच्या सी.एस.आर. निधीतून ४० सिलिंग फॅन, मेरापथ एज्युकेशन लिमिटेड, अहमदनगर यांच्या सी.एस.आर. निधीतून स्ट्रीट लाईट फिटिंगची कामे पूर्ण करण्यात आली. त्याचप्रमाणे घरकुलांना रंगरंगोटी व वृक्षारोपण ग्रामपंचातीने केले.

अशा प्रकारे केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजना, सी.एस.आर. निधी, विविध योजनांच्या कृती संगमातून ४० घरकुलांचे बांधकामे पूर्ण करून सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून सुंदर गृहसंकुलाची उभारणी करण्यात आली आहे.

येत्या कालावधीत लहान मुलांसाठी अंगणवाडी, प्राथमिक शाळा, सामाजिक सभागृह, उद्यान व खेळ साहित्यासह क्रीडांगण, विरंगुळा केंद्र, पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी टाकी व जोड रस्ता, इ. कामे करण्याचे प्रस्तावीत आहे. या गृहसंकुलामुळे या सर्व लाभार्थ्यांची भटकंती थाबून त्यांना हक्काचा पक्का निवारा मिळाला आहे. त्यासोबतच विविध शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून मुलभूत नागरी सुविधासह रोजगार मिळाल्याने त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. या गृहसंकुलात ही सर्व कुटुंब आनंदाने वास्तव्य करीत असून याकरीता त्यांनी शासनाचे आभार मानले आहे.





# कॉप-शॉप मुळे अंधाच्या जीवनात रोजगाराचा प्रकाश

डेमो हाऊस मध्ये अंध बचत गटांनी कॉप-शॉप सुरू करत कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यात नेत्रदान चळवळीतून नवा इतिहास रचला गेला आहे. कॉप-शॉपमुळे दीपस्तंभ' बचत गटातील दृष्टीहिनांच्या हाताला काम देत त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केलं जात असून हा बचत गट राज्यातील अंधाचा पहिला बचत गट ठरला आहे.

कोल्हापुरपासुन ६५ किलोमीटरवर अंतरावर असलेल्या गडहिंग्लज तालुक्यामधील छोटसं गाव 'अत्याळ' याच गावात अकरा वर्षापूर्वी नेत्रदान चळवळीचा पाया घातला गेला. निरपेक्ष आणि सामाजिक भावनेतून सुरु केलील्या चळवळीतून आणखी एक विधायक बाब म्हणजे दृष्टीहिन लोकांच्या हाताला काम देण्याच ठरलं. दीपस्तंभ स्वयंसहायता समूह या नावाने राज्यातील पहिलाच अंधांचा बचत गट तयार करण्यात आला. या निर्णयाने चळवळीतील लोकांनी लोकांसमोर एक आदर्श निर्माण केला.

बचत गटातील लोकांना एलईडी बल्ब, चार्जिंग बल्ब, लायटिंग माळा, सोलरच्या वस्तू तयार तयार करणे आदीचे प्रशिक्षण दिले गेले. यासाठी त्यांची प्रशिक्षण कार्यशाळा घेतली गेली. केलेल्या वस्तू विकून त्यांना आर्थिक बळ मिळावं आणि त्यानांही रोजगाराचे प्रात्यक्षिक मिळावे म्हणून गडहिंग्लज कचेरी मार्गावर पंचायत समिती आवारात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत बांधण्यात आलेल्या डेमो हाऊस मध्ये दृष्टिहिनांचे कॉप-शॉप सुरू केले. या कॉप-शॉप मध्ये आठ दृष्टिहिन काम करीत असून त्यांनी तयार केलेल्या उत्पादनाची दीपस्तंभ या ब्रँडखाली विक्री केली जात आहे. कॉप-शॉपमुळे दृष्टिहिनांना रोजगार मिळाल्याने ते स्वावलंबी झाले असून त्यांच्या जगण्याला एक नवी दिशा मिळाली आहे. यामधून त्यांना आतापर्यंत ६ ते ७ लक्ष रूपयांचा लाभ झाला आहे. त्यांच्या या कामगिरीचे आणि जिद्दीचे सर्वस्तरावर कौतुक होत आहे.

पंचायत समिती आवारात डेमो हाऊस मध्ये दृष्टिहिनांच्या दीपस्तंभ कॉप-शॉपच्या माध्यमातून नेत्रदानाची चळवळ सुरू करण्यात आली असून यामुळे अत्याळ गाव आणि आजुबाजूच्या गावामध्ये आतापर्यंत तब्बल ९६ लोकांचे मरणोत्तर नेत्रदान झाले आहे. वर्षागणिक चळवळीचा परीध विस्तारत आहे. सध्या गडहिंग्लज आणि आजरा तालुक्यात चळवळीचे काम सुरू आहे. गावानुसार पुढीलप्रमाणे नेत्रदान झाले आहे.

या बचत गटातील अंध महिला सदस्य श्रीमती रेश्मा उंडाळकर सांगतात, "महागाव ते गडहिंग्लज असा प्रवास करत गडहिंग्लज मधील दीपस्तंभ कॉप-शॉप मध्ये काम करते. या कॉप-शॉपमुळे आमच्या हाताला काम मिळालं. आम्ही आर्थिकदृष्ट्या सक्षम झालो. हे काम करायलो लागलो तेव्हापासून आत्मविश्वास आला, मानसिक बळ मिळालं. हाताला काम नव्हते तेव्हा एक प्रकारचा मानसिक ताणतणाव होता. दिवसभर काय करायचा हा प्रश्न होता, पण हे काम करायला लागले तेव्हापासून दिवस कामामुळे हसत-खेळत कसा जातो कळत नाही. या कॉप-शॉप मुळे आम्हाला रोजगार मिळाला असून आमचे जीवनमान उंचावले असल्याचे श्रीमती रेश्मा उंडाळकर यांनी सांगितले.

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत राज्यातील प्रत्येक पंचायत समिती आवारात डेमो हाऊसची निर्मिती करण्यात आली आहे. कालांतराने ही फक्त मार्गदर्शक वास्तु न राहता यातून ग्रामीण भागातील जनतेला कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध व्हावा या संकल्पनेतून लाभार्थी/महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ग्रामसंघ /प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून कॉप-शॉप (Co-op Shop) सुरु करण्यात आले. यामुळे बचत गटांना उत्पादने विक्रीस शाश्वत बाजारपेठ मिळाली असून स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती व ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. बाजारपेठेत व लोकांमध्ये वेगळी ओळख व ब्रॅण्ड तयार करण्यासाठी कॉप-शॉप लोगोची निर्मिती केली आहे.





# रायतळे गावात सर्व मुलभूत नागरी सुविधायुक्त गृहसंकुलाची उभारणी

रायतळे ग्रामपंचायत जव्हार तालुक्यातील पालघर जिल्ह्यामध्ये आहे. या ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्या ४,१२५, एकूण कुटूंब संख्या १,७०० व विविध आवास योजने अंतर्गत एकूण घरकूले पूर्ण लाभार्थी संख्या ६० इतकी आहे.

"महा आवास अभियान २०२१-२२" मध्ये राज्य पुरस्कृत आवास योजना अंतर्गत **ग्रामपंचायत रायतळे, तालुका जव्हार, जिल्हा, पालघर यांची 'महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' सर्वोत्कृष्ट गृहसंकुल म्हणून प्रथम क्रमांकाच्या पुरस्कारासाठी** राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती मार्फत निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या या सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी महाराष्ट्र राज्याचे मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

रायतळे ग्रामस्तरीय महा आवास अभियान कार्यशाळा दि. १६ डिसेंबर २०२१ ग्रामपंचायत कार्यालयात संपन्न झाली. या कार्यशाळेला सर्व ग्रामस्थ, लाभार्थी, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, तलाठी, तालुकास्तरीय अधिकारी/कर्मचारी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन व सादरीकरण ग्रामसेवक व तलाठी यांनी केले.

" महा आवास अभियान २०२१-२२" अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत गृहसंकुल उभारणे या उपक्रमात ग्रामपंचायतीने सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांच्या या यशस्वी कामगिरीसाठी ग्रामपंचायतीचे सरपंच श्रीमती अरुणा कृष्णा चौधरी, उपसरपंच श्री. संतोष गणपत गोविंद, ग्रामसेवक श्री. वसंत बी. भोरे व ग्रामाण गृहनिर्माण अभियंता श्री. अक्षय राथड यांनी परिश्रम घेतले. त्यांच्या या यशात ग्रामपंचायतस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीच्या सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

रायतळे गावातील १ ९ कुटुंबे स्वतःची जागा नसल्याने दुसऱ्याच्या जागेमध्ये कच्च्या घरामध्ये राहत होतो. या सर्व लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर होते, परंतु त्यांच्याकडे स्वतःची जागा नसल्यामुळे बांधकाम करणे शक्य नव्हते. "महा आवास अभियान २०२१-२२" अंतर्गत या १९ घरकुल लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याकरिता गृहसंकुला बाबत मार्गदर्शन देण्यात आले. तसेच लाभार्थ्याला बांधकाम साहित्य उपलब्ध होण्यासाठी बचत गटांमार्फत सिमेंट विटा व इतर साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. अशा प्रकारे या घरकुल लाभार्थ्यांची गृहसंकुल बांधल्याने त्यांच्या कुटुंबाला निवारा मिळाला. या सोबतच रोटरी जिल्हा ३१४१ या संस्थेचे रू.७०,०००/- अधिकचे अर्थसहाय्य मिळाल्याने माझ्या घराला प्लास्टर, रंग, किचन ओटा व फरशी इ. सुविधा व करण्यास मोठी मदत झाली. तसेच इतर शासकीय योजनांशी कृतीसंगमातून इतरही शासकीय योजनांचा लाभ मिळाला लाभ जसे- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रोजगार, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून शौचालय, प्रधानमंत्री उज्वला योजने मधून गॅस जोडणी, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना मधून उपजिविकेचे साधन. याबद्दल लाभार्थ्यांनी त्यांना सहकार्य करणारे सरपंच, उपसरपंच, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक व इतर शासकीय यंत्रणा यांचे शतशः ऋणी असल्याचे मत लाभार्थ्यांनी व्यक्त केले.

ग्रामस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरण सोहळा ग्रामपंचायत रायतळे येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी ग्रामस्तरीय पुरस्कार विजेत्यांना ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्या शुभहस्ते व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.





# फोटो गॅलरी


क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले
यांच्या जयंती निमित्त महिला सन्मान सोहळा
व विविध योजनांच्या लाभाचे वाटप
उमेद














ग्राम विकास व पंचायत राज विभाग
भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त
अमृत महा आवास अभियान
जिल्हा परिषद कोल्हापूर
पंचायत समिती शाहूवाडी
महाआवास अभियान ग्रामीण टप्पा क्र.३ सन २०२३-२४

# जास्तीत जास्त कुटुंबांना घरकुलाचा लाभ द्या : आ. कोरे

पन्हाळा : पन्हाळा पंचायत समिती प्रशासनाकडून महाआवास अभियान अंतर्गत ग्रामस्तरावरील पात्र कुटुंबांना मागेल त्याला घरकुल योजना प्रभावीपणे राबवली जात आहे. सरपंच आणि पदधिकाऱ्यांनी गावातील गरजू कुटुंबांची नावे पात्र यादीत समावेश करून जास्तीत जास्त कुटुंबांना घरकुलाचा लाभ देऊन गावाचा विकास साधला पाहिजे, असे प्रतिपादन आमदार डॉ. विनय कोरे यांनी केले.

ते पन्हाळा पंचायत समिती च्यावतीने आयोजित महाआवास अभियान कार्यशाळेत मार्गदर्शन

महाआवास अभियान मेळाव्यात लाभार्थ्यांचा सत्कार करताना आ. विनय कोरे, सोबत सोनाली माडकर, माधवी शिंदे यांच्यासह मान्यवर.

प्रसंगी प्रमुख पाहुणे बोलत होते. याचे उद्घाटन आ. कोरे यांच्या हस्ते प्रतिमपूजन करून दिप्रज्वलनाने झाली. यावेळी प्रांत अधिकारी समिर शिंगटे, तहसीलदार माधवी शिंदे, गट विकास अधिकारी सोनाली माडकर, आरोग्य अधिकारी एस. एस. गायकवाड, माजी सभापती अनिल कंदुरकर उपस्थित होते. महाआवास अभियानात कार्यरत तसेच उत्कृष्ट घरकुल लाभार्थी कुटुंबांचा आणि अनुपमान

गावठाण विस्तार झाला नसल्याने जागा नसणाऱ्या कुटुंबांना पात्र यादीत नावे असूनही वंचित राहावे लागते आहे. सर्व ग्राम पंचायतीने गावठाण विस्तार प्रस्ताव द्यावेत, असे आवाहनही आ. कोरे यांनी केले.

भारत अभियान पुरस्कार राबवून शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या आशा सेविकांचा आ. कोरे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन विस्तार अधिकारी प्रकाश सुर्यवंशी, पी. डी. भोसले, राजेंद्र तळपे यांनी केले.

## नगरची कामगिरी राज्यासाठी दिशादर्शक : राधाकृष्ण गमे

'अमृत महाआवास'मध्ये नगर जिल्ह्याला प्रथम पुरस्काराचे वितरण

## शिराळा पंचायत समितीला यशवंत पंचायतराज पुरस्कार प्रदान

## प्रधानमंत्री जनजाति आदिवासी न्याय महाभियान के तहत मढ में लाभ का वितरण

## जिल्ह्यात साडेतेवीस हजार ओबीसींना मिळणार घर

# कातकरी समाजातील प्रत्येक लाभार्थ्याला योजनांचा लाभ देणार

जितेंद्र डुडी; प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानास जिल्ह्यात प्रतिसाद

११ लाभार्थीना मोदींच्या हस्ते हप्ता ऑनलाइन वितरित



मेढा : कातकरी समाजातील लाभार्थीना विविध योजनांचा लाभ देताना जितेंद्र डुडी, आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, ज्ञानेश्वर खिलारी, संतोष हराळे व इतर.

## पीएम जनमन योजनेअंतर्गत विविध योजनांच्या लाभार्थीना लाभाचे वाटप

## २४ कोलामबहुल गावांत राबविणार 'पीएम जनमन' योजना

## ३ हजार १७० घरकुलांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन

# मोदी आवास योजनेत विभागात हिंगोली दुसरा

जिल्हाभरात आतापर्यंत १२५५ लाभार्थीना दिले अग्रिम : शंभर टक्के ऑनलाइन मंजुरी

## प्रजासत्ताक दिन सोहळ्याचे घरकुल लाभार्थ्यांना निमंत्रण

## मोदी आवास योजनेत विमुक्त जाती, भटक्या जमातींचा समावेश

## आवास योजनेत साडेपाच हजार प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता

पात्र लाभार्थ्यांनी प्रस्ताव सादर करण्याचे यंत्रणेचे आवाहन

# कातकरी नागरिकांना योजनांचा लाभ द्या

जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांचे प्रतिपादन

२२६ गावांमध्ये योजना

# प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेमध्ये जत तालुक्याचे उल्लेखनीय काम

## मुदतीत घरकुले न बांधल्यास शासन अनुदान जाणार परत

## बेघरांना मिळालं हक्काचं घर..; वर्षात ५४ हजार जणांचा गृहप्रवेश

केंद्र व राज्याची मिळतेय मदत; जिल्हा परिषदेकडून मिळतोय फायदा

# जिल्ह्यात ३ हजार ३५४ ओबीसींना मिळणार घर



हिंगोली : राज्य शासनाने राज्यात ओबीसी प्रवर्गातील नागरिकांना घरकुलासाठी 'मोदी आवास घरकुल योजना' सुरू करण्याची घोषणा केली होती. या योजनेचे हे पहिलेच वर्ष असून, जिल्ह्याला ३ हजार ३५४ घरकुलांचे उद्दिष्ट आहे. या योजनेंतर्गत १०० टक्के घरकुलांना मंजुरी मिळाली असून, संबंधित लाभार्थ्यांना आवश्यक त्या सूचनाही देण्यात आल्या आहे.

### कोणाला मिळणार योजनेचा लाभ?


ग्रामीण भागात १५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळ वास्तव्यास असणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील आवास प्लसमधील प्रतीक्षा यादीत नाव असलेले लाभार्थी, आवास प्लस प्रणालीवर नोंद झालेले; परंतु, ऑटोमॅटिक सिस्टिमद्वारे रद्द झालेले पात्र लाभार्थी, जिल्हा निवड समितीने शिफारस केलेल्या लाभार्थीना या योजनेचा लाभ मिळणार आहे. केंद्र व राज्य सरकारने सूचित केलेल्या ओबीसी कुटुंबाला घरकुलाचा लाभ घेता येतो.

**३३५४**
घरकुलांचे उद्दिष्ट
मोदी आवास योजनेंतर्गत हिंगोली जिल्ह्यात ३ हजार ३५४ घरकुलांचे उद्दिष्ट आहे. या योजनेचे यंदा पहिलेच वर्ष आहे.

### शंभर टक्के घरकुलांना दिली मंजुरी

जिल्ह्यात उद्दिष्ट असलेल्या ३ हजार ३५४ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. शंभर टक्के उद्दिष्टपूर्ती झाली असून, लाभार्थ्यांना यंत्रणेने सूचनाही केल्या आहेत.

### तालुकानिहाय संख्या




### लवकरच होणार कामांना सुरुवात

मोदी आवास योजनेंतर्गत मंजूर झालेल्या ३ हजार ३५४ घरकुलांपैकी सर्वच घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. या घरकुलांच्या कामांना लवकर सुरुवात होऊन ती पूर्ण व्हावीत या अनुषंगाने संबंधित लाभार्थ्यांना सूचना करण्यात आल्या आहेत. याचा नियमित आढावाही घेण्यात येत आहे.

मोदी आवास योजना २०२२-२३ अंतर्गत घरकुलांची मंजुरी प्रक्रिया शंभर टक्के पूर्ण झाली आहे. संबंधित लाभधारकांकडून लवकरात लवकर घरकुलांचे काम पूर्ण करण्यासाठीही यंत्रणेच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

- नामदेव केंद्रे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा. वि. यंत्रणा, हिंगोली.

## मोदी आवास योजनेतील पात्र लाभार्थ्यांनी प्रस्ताव सादर करावेत - सीईओ विनय मून यांचे आवाहन

# 'मोदी आवास'मध्ये जिल्हा राज्यात प्रथम

उद्दिष्टामधील शंभर टक्के घरकुले मंजूर : धोडमिसे, ओसवाल यांची कामगिरी

जिल्हा परिषदेतून

## घरकूल योजनेची उद्दिष्टपूर्तीने लाभार्थीना न्याय

तृप्ती धोडमिसे : जत येथे आढावा बैठक; आवास योजनेची अंमलबजावणी

## घरकुलाचा एक हप्ता उचलूनही बांधकाम न करणाऱ्यांवर बोजा

## प्रधानमंत्री घरकुल योजनेत माडग्याळ ग्रामपंचायत प्रथम

## इंदापुरात ३१६ घरकुले मंजूर; अर्ज केला का?

पंचायत समितीने पार केले 'मोदी आवास'चे उद्दिष्ट

## निफाड तालुक्यातील दीड हजार घरकुलांचे स्वप्न पूर्ण

झोपडपट्टीचा चेहरामोहरा बदलणार; कष्टकऱ्यांचे जीवनमान उंचावणार

## साडेआठशे कुटुंबांना मिळणार हक्काचे घर

## नमो आवासमध्ये ५५३४ प्रस्तावांना मान्यता

## घराची मंजुरी असूनही बेघर लाभार्थी रडारवर

## मोदी अवास योजने अंतर्गत येळवी व खैराव येथील १८ बेघरांना घरकुले मंजूर

## दीड हजार नागरिकांची होणार घरकुलाची स्वप्नपूर्ती

मोदी आवास घरकूल योजनेची २० दिवसांत वाढली गती

## एक हजार ३१० लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न होणार साकार

## जात प्रमाणपत्रासाठी गावागावात विशेष कॅम्प - बीडीओ आडेराघो

## घरकुल बांधा; अन्यथा नमुना नं.८ वर बोजा

अपूर्ण घरकुलांचे सोयगाव पंचायत समितीकडून सर्वेक्षण सुरु

अपूर्ण काम पूर्ण करण्याच्या सूचना

## आवास योजनेचा पहिला हप्ता खात्यात जमा

सोयगांव तालुक्यात ३११ लाभार्थ्यांना मिळाला लाभ



विकसित भारत संकल्प यात्रा प्रसंगी कोल्हापूर येथे मा.केंद्रीय मंत्री, नागरिक उड्डयन मंत्रालय, भारत सरकार यांच्या शुभहस्ते ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थींना प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची प्रतिकृती देवून सन्मान



शासन आपल्या दारी कार्यक्रमा प्रसंगी पुणे येथे मा.मंत्री, सहकार श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्या शुभहस्ते ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थींना प्रातिनिधीक स्वरूपात घरकुलाची चावी देवून सन्मान



महा आवास अभियान २०२३-२४ विभागस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी विभागीय आयुक्त, पुणे डॉ.चंद्रकात पुलकुंडवार यांच्या हस्ते विभागस्तरीय अमृत महा आवास अभियान २०२२-२३ पुरस्कार वितरण



महा आवास अभियान २०२३-२४ विभागस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी विभागीय आयुक्त, नाशिक डॉ.राधाकृष्ण गमे यांच्या हस्ते विभागस्तरीय अमृत महा आवास अभियान २०२२-२३ पुरस्कार वितरण

“महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
राज्यातील सर्वांसाठी आवास”





## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
दुरध्वनी क्रमांक - ०२२ - २७५६१८२४, महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९
ईमेल - directoriayruralhousing@gmail.com, संकेतस्थळ - www.mahaawaas.org